cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६० | शनिवार दि.१७ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

### जनतेचा कौल आणि विरोधकांचा भ्रमभंग

राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांतील सत्ता बदल दर्शवत नाहीत, तर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा ठळकपणे अधोरेखित केली आहे. मुंबई, पुणे, पिंपरी–चिंचवड, नाशिकसह तब्बल २६ महानगरपालिकांवर भाजप व महायुती सत्ता प्रस्थापित करण्याच्या मार्गावर असल्याने भाजपचा राज्यातील राजकीय दबदबा निर्विवादपणे स्पष्ट झाला आहे.

# बोगस बियाणे विकणाऱ्यांची आता हयगय नाही

## या संदर्भातील कायद्याची अंमलबजावणी सुरू, केंद्रीय कृषीमंत्र्यांनी दिली माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

अलीकडच्या वर्षात बोगस बियाण्यांचा सुळसुळाट झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना याचा फटका सहन करावा लागून आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. आता यावर उपाय म्हणून बियाणे कायदा अमलात आणण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना सध्या निकृष्ट बियाण्यांमुळे समस्या येत आहेत आणि या विधेयकामुळे त्यातून दिलासा मिळेल अशी आशा आहे. याबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान म्हणाले की, आता देशभरात एक प्रणाली उभी केली जाईल. जी बियाणे कुठे उत्पादित केले



गेले, कोणत्या विक्रेत्याने पुरवले आणि ते कोणी विकले, याची संपूर्ण माहिती देईल. प्रत्येक बियाण्यावर एक कोड असेल, जो स्कॅन केल्यावर शेतकऱ्यांना बियाणे कुठून आले, हे ओळखता येईल. यामुळे केवळ निकृष्ट किंवा बनावट बियाणे रोखता येणार नाही, तर जर ते बाजारात आले तर जबाबदार असलेल्यांवर कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.

कृषीमंत्री शिवराज सिंह म्हणाले की, ट्रेसेबिलिटी लागू होताच बनावट किंवा निकृष्ट दर्जाचे बियाणे त्वरित ओळखले जाईल. ते म्हणाले, निकृष्ट दर्जाचे बियाणे आयात केले जाणार नाही आणि जर ते आयात केले गेले तर त्यांना पकडले जाईल. निकृष्ट दर्जाचे बियाणे पुरवठा करणाऱ्या कोणालाही शिक्षा केली जाईल. यामुळे ▶▶ पान २ वर

### दंड आणि शिक्षा

शिवराज सिंह म्हणाले की, बियाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणताही निष्काळजीपणा आता सहन केला जाणार नाही. चौहान म्हणाले, ''आतापर्यंत दंड ५०० रुपयांपर्यंत होता. आता दंड ३० लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. जर कोणी जाणूनबुजून गुन्हा केला तर शिक्षेचीही तरतूद आहे.'' ते म्हणाले की, सर्व कंपन्या वाईट नाहीत, परंतु शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

## थोडक्यात...

### भाजपच्या प्रदेशाध्यक्षाची निवड २० जानेवारी रोजी

नवी दिल्ली : भाजपच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, २० जानेवारी रोजी पक्षाच्या नव्या अध्यक्षांची अधिकृत घोषणा होणार आहे. अध्यक्षपदासाठी १९ जानेवारी रोजी नामांकन दाखल केले जाईल. आवश्यक असल्यास २० जानेवारी रोजी मतदान घेतले जाणार आहे. पक्षाच्यावतीने शुक्रवारी अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी करण्यात आली. या अधिसूचनेनुसार, १६ जानेवारी रोजी मतदारांची यादी प्रसिद्ध केली जाईल. १९ जानेवारी रोजी अध्यक्षपदासाठी नामांकन दाखल केले जाईल आणि आवश्यकता भासल्यास मंगळवार, २० जानेवारी रोजी अध्यक्षपदाची निवडणूक होईल. दरम्यान, निवडणुकीत विद्यमान कार्याध्यक्ष नितीन नवीन हे एकमेव उमेदवार म्हणून अर्ज दाखल करण्याची दाट शक्यता आहे

### दिल्लीतील विषारी हवेने दररोज २५ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली: दिल्लीतील वाढते प्रदूषण आणि बदलती जीवनशैली यांचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. दिल्ली सरकारने जाहीर केलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये श्वसनाशी संबंधित आजारांमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या २०२३च्या तुलनेत वाढली आहे, तर हृदयविकार हे मृत्यूचे सर्वात मोठे कारण ठरले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, आकडेवारीचा सरासरी आढावा घेतल्यास, २०२४ मध्ये दिल्लीत श्वसनाशी संबंधित आजारांमुळे ९,२११ मृत्यू झाले. म्हणजेच, राजधानीत दररोज सुमारे २५ जणांचा मृत्यू श्वसनाशी संबंधित आजारांमुळे झाला, तर २०२३ मध्ये ८,८०१ मृत्यू झाले. म्हणजेच, एका वर्षात श्वसनविकारांमुळे मृत्यूंची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे.

### संभाजीनगरात मतमोजणीस्थळी लाठीचार्ज

छ. संभाजीनगर: राज्यात शुक्रवारी छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांची मतमोजणी झाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्येही ४ ठिकाणी मतमोजणी सुरू होती. या चारही ठिकाणी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व नागरिकांनी निकाल ऐकण्यासाठी गर्दी केली होती. त्यातच उस्मानपुरा येथील शासकीय अभियांत्रिकी मतमोजणी केंद्रावर मतमोजणी सुरू होण्यापूर्वी पोलिसांनी गर्दी पांगवण्यासाठी तुफान लाठीमार केला. त्यात शिंदे गटाचे नेते तथा शहराचे माजी महापौर विकास जैन जबर जखमी झाले असल्याचे सांगण्यात आले. या घटनेचा एक व्हीडीओ व्हायरल झाला आहे. त्यात पोलिस कर्मचारी नागरिकांना घेरून काठ्यांनी मारहाण करताना दिसून येत आहे.

# राज्यात भाजपची जोरदार मुसंडी!

## मुंबई, पुण्यासह बहुतांश महानगरपालिका जिंकल्या; मुंबईत ठाकरेंची २५ वर्षांची सत्ता संपुष्टात

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या निकालात भाजपने जोरदार मुसंडी मारली आहे. मुंबई, पुण्यासह बहुतांश महानगरपालिका भाजपने जिंकल्या आहेत. मुंबईत भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने बहुमत मिळवले आहे. तर येथे ठाकरेंची २५ वर्षांची सत्ता संपुष्टात आली आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दमदार नेतृत्वाखाली मुंबई, पुणे, पिंपरी–चिंचवड, नाशिकसह एकूण २५ महानगरपालिकांवर भाजप आणि महायुती सत्ता प्रस्थापित करू शकणार आहे. विधानसभा, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांनंतरही भाजप राज्यातील नंबर वन पक्ष म्हणून निर्विवादपणे उदयास आला आहे. दुसरीकडे, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मुंबई महापालिका गमावल्यानंतर आणखी एक मोठा धक्का बसला आहे. सांगली, मिरज आणि कुपवाड या तीन महानगरपालिकांमध्ये ठाकरे गटाला एकही जागा मिळाली नाही. या तीनही महापालिकांमध्ये एकूण ७८ जागा होत्या, ज्यामध्ये भाजप तब्बल ३९ जागा जिंकून सत्तेच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे.



### पिंपरी–चिंचवड भाजपाकडेच

राज्याचे लक्ष लागलेल्या पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने १२८ जागांपैकी ८४ जागा जिंकून महापालिकेवर आपला झेंडा फडकवला आहे. सत्ता स्थापनेसाठी आवश्यक असलेला ६५ जागांचा जादूई आकडा भाजपने सहज ओलांडला असून शहरात पुन्हा एकदा ‘कमळ’ फुलले आहे. दुसरीकडे, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला ३७ जागांवर समाधान मानावे लागले आहे. शिवसेना शिंदे गटाला ६ जागा मिळाल्या तर एक अपक्ष उमेदवार निवडून आला आहे.

### महाराष्ट्रातील जनेतचा मोदी यांच्यावर विश्वास – मुख्यमंत्री

मुंबईसह राज्यातील महापालिका आणि नगरनिकाय निवडणुकांमध्ये भाजप–शिवसेना युतीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ही निवडणूक आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या स्पष्ट व्हिजनसह लढलो. त्यामुळेच महाराष्ट्रातील जनतेने आम्हाला विक्रमी जनादेश दिला, असे फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या निकालांमधून महाराष्ट्रातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदींवर किती विश्वास ठेवते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. प्रत्येक शहर बदलण्याचा, त्या शहरात राहणाऱ्या गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा आमचा संकल्प आहे. नागरी सुविधा, पायाभूत विकास आणि सुशासन यालाच जनता पाठिंबा देत आहे, असे त्यांनी नमूद केले.

### ‘नाशिक’मध्ये भाजपची एकहाती सत्ता

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या नाशिक महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजप) दणदणीत विजय मिळवला आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या निवडणुकीत भाजपने स्वबळावर बहुमताचा जादुई आकडा ओलांडून नाशिकचा गड राखला आहे. नाशिक महापालिकेच्या एकूण १२२ जागांपैकी भाजपने ६६ जागांवर आघाडी घेत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. विजयासाठी आवश्यक असलेला ६२ हा जादुई आकडा भाजपने सहज पार केला आहे. तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली असून, ते दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आले आहेत.

### मराठवाड्यात शिंदेसेना बॅकफुटवर

छत्रपती संभाजीनगर पाठोपाठ नांदेडमध्ये पण भाजपने मोठी मुसंडी मारली. या दोन्ही महानगरपालिकांमध्ये भाजपची एकहाती सत्ता आली असल्याचे म्हटले जात आहे. निवडणुकीच्या निकालानंतर जी आकडेवारी समोर आली आहे. त्यामुळे विरोधकांचा सुपडासाफ झाल्याचे दिसून येत आहे. दोन्ही राष्ट्रवादीचे अस्तित्वच पणाला लागल्याचे दिसत आहे. तर ठाकरेंच्या सेनेचा मराठवाड्याचा गड चढतानाच श्वास फुलला. तर एकनाथ शिंदेंची शिवसेना मात्र चांगलीच बॅकफुटवर गेली आहे.

### “ कोल्हापुरात महायुतीची सत्ता मात्र एकट्या सतेज पाटलांनी घाम फोडला

अवघ्या राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला काठावरचे बहुमत मिळाले आहे. कोल्हापूरमध्ये महायुतीविरुद्ध काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते तथा कोल्हापूर काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांच्यात थेट लढत होती. मात्र, पाटील यांनी एकहाती मैदान मारताना तब्बल ३४ जागा निवडून आणल्या आहेत. शिवसेना ठाकरे गटाला केवळ एक जागा मिळाल्याने केवळ ६ जागांमुळे कोल्हापूरची महापालिका सतेज पाटील यांच्या हातून निसटली आहे. महायुतीच्या प्रचारामध्ये दस्तूरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह दिग्गज नेते प्रचारात उतरूनही सतेज पाटील यांनी काँग्रेससाठी लक्षणीय यश मिळविले आहे.

### “ एमआयएमचे २९ महानगरपालिकांमध्ये ९५ उमेदवार विजयी

या निकालातील महत्त्वाची बाब म्हणजे असदुद्दीनं ओवेसी यांच्या एमआयएमने महापालिका निवडणुकीत मोठी मुसंडी मारली आहे. महाराष्ट्रातील २९ पैकी १३ महापालिकेत एमआयएमचे ९५ उमेदवार विजयी झाले आहेत. विशेष बाब म्हणजे एमआयएमने मुंबईत देखील जोरदार मुसंडी मारली आहे. अबू आझमी यांच्या समाजवादी पक्षाचा गड असलेल्या मानखुर्दमध्ये देखील एमआयएमने दमदार विजय मिळवला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत एमआयएम दुसऱ्या स्थानावर आहे.

### “ राज्यातील २२ मनपात मनसेला भोपळा

आपल्या राजकारणात नेहमी मराठी आणि स्थानिक विरुद्ध बाहेरचे, असा मुद्दा मांडणाऱ्या मनसेला या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. राज्यातील २२ शहरांत मनसेला एकही जागा मिळालेली नाही. एकूणच पक्ष दहाच्या आकड्यातही पोहोचताना दिसत नाही. पुणे, संभाजीनगर, कोल्हापूर, सांगली–मिरज, मीरा–भाईंदर, वसई–विरार, भिवंडी, पनवेल, नागपूर, परभणी, जालना, पिंपरी–चिंचवड, सोलापूर, मालेगाव, जळगाव, धुळे, इचलकरंजी, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर येथे मनसेचे खातेही उघडलेले नाही.

### “ काँग्रेसचे ५ शहरांत महापौर तर ३५० नगरसेवक

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेले यश समाधानकारक नसले तरी यश अपयशाची पर्वा न करता आम्ही वैचारिक लढाई लढलो. जनतेचा विश्वास व कार्यकर्त्यांचा निर्धाराचा लढा या जोरावर काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसत आहे. पाच शहरांत काँग्रेसचा महापौर तर ३५० नगरसेवक आणि १० ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ असे चित्र आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# लातूरमध्ये विलासराव देशमुखांच्या कुटुंबाची जादू कायम

## काँग्रेसचा दणदणीत विजय, भाजपची हार

**लातूर । प्रतिनिधी**

राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसने आपला गड राखत दणदणीत विजय संपादन केला आहे. आमदार अमित देशमुख यांच्या झंझावाती नेतृत्वाखाली काँग्रेसने ७० पैकी तब्बल ४७ जागांवर विजय मिळवून महापालिकेवर एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. या निवडणुकीत भाजपला केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ▶▶ पान २ वर



# परभणी मनपावर ठाकरे गटाचा भगवा फडकणार !

**परभणी । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत राज्यभरात भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या महायुतीने मजबूत कामगिरी केली आहे. मुंबईसह अनेक प्रमुख महापालिकांमध्ये महायुतीचे वर्चस्व दिसत असताना, परभणी महानगरपालिकामध्ये मात्र वेगळे चित्र आहे. येथे शिवसेना ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जानेवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ३२.०० क्विंटल** | | |
| २,३०० | ६,६०० | २,९७३ |
| **ज्वारी/हायब्रिड: २४.५० क्विंटल** | | |
| २,३०० | ३,६९५ | ३,१२४ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| **तूर :७४.५० क्विंटल** | | |
| ६,००० | ७,३०१ | ६,९६५ |
| **उडीद : ७.५० क्विंटल** | | |
| २,५०१ | ६,५०० | ५,०८८ |
| **बाजरी: ३१.०० क्विंटल** | | |
| २,१०० | ३,२५१ | २,८९५ |
| **मुग: १.०० क्विंटल** | | |
| ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| **सोयाबीन: २७.५० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **हरभरा: ०.५० क्विंटल** | | |
| ६,८०० | ६,८०० | ६,८०० |




# थंडीचा कडाका कमीच राहणार

## तापमानात वाढ झाल्याने उकाडाही वाढला

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील किमान आणि कमाल तापमानात झालेली वाढ कायम आहे. यामुळे थंडी कमीच आहेत. राज्यात पुढील २ दिवस तापमानातील वाढ कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे थंडीही कमीच राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

राज्यात मागील आठवडाभरापासून ढगाळ हवामान आणि पावसाला पोषक वातावरण झाल्याने थंडी कमी झाली आहे. किमान तापमानात वाढ झाली. तसेच कमाल तापमान वाढल्याने उकाडाही वाढला आहे. अनेक भागात दुपारी उन्हाचा चटकाही जाणवत आहे. राज्यातील बहुतांशी भागात सकाळचे किमान तापमान १२ अंशाच्याही पुढे आहे. तर कमाल तापमान बहुतांशी भागात ३० अंशाच्या दरम्यान पोचले आहे. वाढलेले तापमान आणि ढगाळ हवामान यामुळे उकाडा चांगलाच वाढला आहे. राज्यातील तापमानातील वाढ आणखी २ दिवस टिकून राहण्याची शक्यता आहे. आज राज्यातील सर्वाधिक ३३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यामुळे पुढील २ ते ३ दिवस राज्यात थंडी कमीच राहू शकते, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

cmyk

अग्रलेख

# जनतेचा कौल आणि विरोधकांचा भ्रमभंग

राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांतील सत्ता बदल दर्शवत नाहीत, तर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा ठळकपणे अधोरेखित केली आहे. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिकसह तब्बल २६ महानगरपालिकांवर भाजप व महायुती सत्ता प्रस्थापित करण्याच्या मार्गावर असल्याने भाजपचा राज्यातील राजकीय दबदबा निर्विवादपणे स्पष्ट झाला आहे. यातून जनतेचा कौल आणि विरोधकांचा भ्रमभंग स्पष्टपणे दिसतो आहे.

मुंबई महानगरपालिकेतील निकाल हा या निवडणुकीचा केंद्रबिंदू ठरतो. तब्बल पंचवीस वर्षे अखंडपणे सत्तेत असलेल्या ठाकरे नेतृत्वाखालील शिवसेनेची सत्ता संपुष्टात येणे हा केवळ पराभव नसून, तो जनतेकडून मिळालेला स्पष्ट राजकीय संदेश आहे. बदलाची गरज, प्रशासनातील पारदर्शकता आणि प्रभावी नेतृत्व या मुद्द्यांवर मतदारांनी आपली भूमिका ठामपणे मांडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांपासून विधानसभेपर्यंत सातत्यपूर्ण यश मिळवले आहे. हे यश संघटनात्मक ताकद, केंद्र आणि राज्यातील सत्तेचा समन्वय तसेच विकासाभिमुख राजकारणाचा परिणाम मानावा लागेल. महानगरपालिकांमध्ये मिळालेले वर्चस्व हे आगामी काळातील धोरणात्मक निर्णयांवर भाजपचा प्रभाव अधिक वाढवणारे ठरणार आहे. दुसरीकडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटासाठी हे निकाल आत्मपरीक्षणाची वेळ आणणारे आहेत. संभाजीनगरसारख्या पारंपरिक बालेकिल्ल्यावर सत्ता गमावणे, हे संघटनात्मक कमकुवतपणाचे स्पष्ट संकेत आहेत. राज ठाकरे यांच्याशी केलेली युती अपेक्षित परिणाम साधू शकली नाही, ही बाबही विरोधकांसाठी चिंताजनक आहे.

राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल हे केवळ सत्ताबदलाचे आकडे नाहीत, तर ते विरोधकांच्या राजकारणावर जनतेने दिलेला कठोर निकाल आहे. मुंबईपासून पुणे, नाशिक, संभाजीनगरपर्यंत भाजप व महायुतीने मिळवलेले प्रचंड यश हे विरोधी पक्षांच्या अपयशावर शिक्कामोर्तब करणारे ठरले आहे. मुंबई महानगरपालिकेतील तब्बल पंचवीस वर्षांची ठाकरे सत्तेची समाप्ती हा इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. वर्षानुवर्षे ''मुंबई आमची'' असा दावा करणाऱ्या ठाकरे गटाला अखेर जनतेने जमिनीवर आणले. मुंबईचा कारभार भावनिक घोषणांवर, कुटुंबकेंद्री राजकारणावर आणि सत्तेच्या सवयीवर चालतो, हा मतदारांचा अनुभव या निकालातून ठळकपणे व्यक्त झाला आहे. उद्धव ठाकरे गटासाठी हा पराभव केवळ आकड्यांचा नाही, तर नेतृत्वाच्या विश्वासार्हतेवर बसलेला घणाघात आहे. सांगली, मिरज आणि कुपवाड या तीनही महानगरपालिकांमध्ये एकही जागा न मिळणे हे संघटनात्मक दिवाळखोरीचे स्पष्ट लक्षण आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या संभाजीनगरमध्येही सत्ता गमावणे म्हणजे ''गड राखण्यात अपयश'' याचे ठळक उदाहरण आहे. राज ठाकरे यांच्यासोबत केलेली युती ही निवडणूक जिंकण्यासाठी नव्हे, तर पराभव झाकण्यासाठीची राजकीय कसरत ठरली. दोन भाऊ एकत्र आल्यास सत्ता आपोआप मिळेल, हा गैरसमज मतदारांनी चोख फेटाळून लावला. केवळ भाषणबाजी, जुन्या आठवणी आणि भावनिक हाकांवर निवडणुका जिंकता येत नाहीत, हे या निकालांनी पुन्हा सिद्ध केले आहे. विरोधकांनी विकासाऐवजी सतत केंद्र आणि राज्य सरकारवर टीका करण्यालाच राजकारण मानले. महागाई, बेरोजगारीसारखे मुद्दे मांडताना स्वतःकडे पर्याय काय आहेत, याचे उत्तर देण्यात ते अपयशी ठरले. परिणामी, मतदारांनी ''विरोधासाठी विरोध'' करणाऱ्या राजकारणाला नकार दिला. या निकालांतून भाजपचा विजय जितका ठळक आहे, तितकाच विरोधकांचा राजकीय भ्रमभंगही उघड झाला आहे. सत्ता ही वारशाने मिळत नाही, तर कामगिरीवर टिकते, हा धडा विरोधी पक्षांना पुन्हा एकदा मिळाला आहे. आज विरोधकांसमोर आत्मपरीक्षणाशिवाय पर्याय उरलेला नाही. अन्यथा, आगामी काळात त्यांची भूमिका सत्ताधाऱ्यांच्या विरोधात उभी राहणाऱ्या सक्षम पर्यायाची न राहता, केवळ राजकीय काठावर उभ्या असलेल्या टीकाकारांचीच राहीलआणि तोच या निवडणुकांचा खरा संदेश आहे. महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जनतेच्या अपेक्षा अधोरेखित करतात. विकास, प्रशासनातील कार्यक्षमता, पायाभूत सुविधा आणि स्थैर्य या मुद्द्यांवर मतदारांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे. भावनिक आवाहनांपेक्षा ठोस कामगिरीला प्राधान्य देण्याची मानसिकता या निकालांतून दिसून येते. मात्र, प्रचंड बहुमत आणि व्यापक सत्ता ही भाजपसाठी केवळ यशाची पावती नसून मोठी जबाबदारीही आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पारदर्शक, लोकाभिमुख आणि भ्रष्टाचारमुक्त राहील, याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांवर आहे. सत्तेच्या जोरावर नव्हे, तर कामाच्या जोरावर विश्वास टिकवावा लागेल.

एकंदरीत, या निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात नवे समीकरण उभे केले आहे. जनतेचा कौल स्पष्ट आहे. आता या कौलाचा सन्मान करत अपेक्षांची पूर्तता करण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांसमोर उभे ठाकले आहे.

# जालन्यात भाजपचा दणदणीत विजय : ६५ पैकी ४१ जागांवर 'कमळ' फुलले

## रावसाहेब दानवे यांचा शब्द खरा ठरला

**जालना । प्रतिनिधी**

**जालना महानगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत एकतर्फी विजय संपादन केला. एकूण ६५ जागांपैकी भाजपने तब्बल ४१ जागांवर नगरसेवक निवडून आणत सत्ता काबीज केली. या निकालामुळे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केलेला विश्वास खरा ठरल्याचे चित्र आहे.**

या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) १२ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर काँग्रेसला ९ जागा मिळाल्या. ने २ जागांवर विजय मिळवत खाते उघडले. एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट व शरद पवार गट) तसेच शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांना एकही जागा मिळवता आली नाही. भाजपच्या या यशामागे केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून जालना शहरात झालेली विकासकामे निर्णायक ठरली. व्यापारी वर्ग व शहरातील नागरिकांनी पुढील काळात अधिक विकास होईल या अपेक्षेने भाजपला पसंती दिल्याचे दिसून येते. दुसरीकडे, वरिष्ठ नेत्यांच्या प्रचाराअभावी शिवसेनेला अपेक्षित यश मिळाले नाही. महाविकास आघाडीतील फूट आणि राष्ट्रवादीची प्रभावहीन कामगिरी याचा लाभ भाजपला झाला. दरम्यान, गौरी लंकेश हत्या प्रकरणातील संशयित म्हणून चर्चेत असलेले श्रीकांत पांगारकर यांनी अपक्ष म्हणून विजय मिळवला आहे. जालन्यातील या निकालामुळे भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले असून शहराच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे मानले जात आहे.

**विजयी उमेदवार उमेदवाराचे नाव**

भदनेकर कल्याण जगदीश, (भाजप), ज्योति रवी सले. (भाजप), दानवे सुशीला भास्करराव. (भाजप), पदमा अजीत मानधानी (भाजप), दानवे भास्करराव मुकुंदराव

**पक्षनिहाय निकाल:**
**भाजप-४१**
**शिवसेना (शिंदे गट)-१२**
**काँग्रेस -९२**
**अपक्ष १**

(भाजप), श्रध्दा दिपक साळवे भाजप , पुजा योगेश भगत शिवसेना , दिपक रविशंकर राठोड शिवसेना , मजहर समर सय्यद भाजप , भगवान चादोंडे भाजप , ऐश्वर्या आडेकर भाजप , कपिल भुरेवाल भाजप , पुनम स्वामी भाजप ,

**भाजप चे ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा १ उमेदवार विजयी...**

१)रूपा कुरिल , २)फारुख तुंडीवाले, ३)सखुबाई पानबिसरे, ४)संजय पाखरे, अक्षय गोरंट्याल भाजप , अनिता खोडवे भाजप , माया जोशी भाजप , अजय भरतीया भाजप ,




गोरंट्याल संगिता कैलास. भाजप, प्रियंका रोहित भुरेवाल (भाजप), विरेन्द्रकुमार अमरचंद धोका (भाजप), संतोष गंगाराम माधोवाले (भाजप), कमलेश जगदिश खरे - शिवसेना, पार्वताबाई महादेव देशमाने. भाजप, स्नेहलता कामड - भाजप, राजेश राऊत - भाजप, पूजा दिनेश भगत - शिवसेना , वर्षा वैजनाथ राऊत - भाजप , रमेश गौरक्षक - भाजप, दुर्गेश कठोठीवाले शिवसेना, मंगल गरदास भाजप , संध्या देठे भाजप , महावीर ढक्का भाजप , विक्रांत ढक्का भाजप, आसिफ अन्सारी - कॉग्रेस, अन्सारी फरहाना अब्दुल रऊफ - कांग्रेस, इंगळे कार्तिका मनोज भाजप, अमजत खान नवाब खान कांग्रेस, इम्रान खान अमानुल्ला खान - काँग्रेस, अब्दुलसगीर अजीज शेख - शिवसेना, सायरा फकरुल्लाह खान - (एआयएमआयएम), खान नगमाबी फेरोज खान - (एआयएमआयएम),भाग्यश्री जोगस भाजप , महेश निकम: भाजप , पांगारकर: विजयी भाजप , श्रीकांत पांगारकर अपक्ष, ॲड. सीमा खरात भाजप, अशोक पांगारकर भाजप, सुलोचना गोर्डे भाजप , शशिकांत घुगे भाजप , संजय पंढरीनाथ डुकरे (शिवसेना), सत्यभामा विजय जाधव (शिवसेना) , अशोक मगनराव पवार (भाजप), वंदना अरुण मगरे (भाजप), निखिल रमेश पगारे शिवसेना, उषाबाई अशोक पांगारकर शिवसेना, आमदार अर्जुन खोतकर यांची कन्या दर्शना विजय झोल शिवसेना , अमोल प्रदिप सिंह ठाकूर शिवसेना असे विजय झालेले सर्व उमेदवाराचे नाव आहे.

# शास्त्री विद्यालयाचे विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत असल्याचा अभिमान-कपिल आकात

**परतूर । प्रतिनिधी**

**संस्थेच्या छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असल्याचा सार्थ अभिमान वाटतो असे प्रतिपादन मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कपिल आकात यांनी केले. विरबॅक ॲनिमल हेल्थ इंडिया प्रा. लि. यांच्या वतीने सामाजिक विकास निधी अंतर्गत येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयास १०० ड्युअल डेस्कचे वितरण करण्यात आले यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते.मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बाबासाहेब वर्पे, डॉ. गजानन सोळंके, अमोल खेडकर, जयदीप गव्हाणे,मदनराव खरात,भगवान राठोड,रामजी खरात,वैभव शेजूळ,अंकुश शिंदे,भास्कर सोळंके, मीना सोळंके यांची उपस्थिती होती.**




आकात पुढे म्हणाले की,ज्या समाजात आपण वाढलो, लहानाचे मोठे झालो त्या समाजासाठी आपण काही तरी करावे अशी भावना अनेकांच्या मनात असते. परंतु ज्यांच्यावर चांगले संस्कार झालेले असतात अशा व्यक्ती या कामात पुढाकार घेतात. अशातील एक म्हणजे डॉ. गजानन सोळंके, बाबासाहेब वर्पे, अमोल खेडेकर व जयदीप गव्हाणे होत.त्यांनी आमच्या शाळेला १०० ड्युअल डेस्क भेट दिले आहेत. याचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी डॉ. गजानन सोळंके म्हणाले की, मी याच शाळेचा माजी विद्यार्थी आहे. शाळेसाठी काहीतरी चांगले करण्याची संधी मिळाली आणि आज शाळेला माझ्या कंपनीच्या विकास निधी अंतर्गत १०० ड्युअल डेस्क प्रदान करण्याचे भाग्य मला लाभले याचा खरोखरच अभिमान वाटतो. माणूस मोठा होण्यात शाळेचे फार मोठे योगदान असते असे ते म्हणाले. मुख्याध्यापक एक. के. बिरादार यांनी प्रास्ताविकात शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या निरनिराळ्या उपक्रमांची माहिती दिली. मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांनी संस्थेचे सचिव कपिल आकात व उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुषहाराने सत्कार केला. कार्यक्रमाला विद्यालयाचे पर्यवेक्षक राजकुमार राऊत, त्र्यंबक घुगे,सहशिक्षिका सविता अवसरमोल,जेष्ठ शिक्षक दत्तात्रय आकात,रामराव पवार, अरुणकुमार वावरे,संदीप वाघमारे,सिद्धार्थ मोरे,बालासाहेब बिडवे,प्रशांत गायकवाड,किरण गवई, बळीराम राठोड, प्रमोद कामठे, उद्धव मगर, वैजनाथ तनपुरे,रवींद्र आकणीकर, बालासाहेब लाटे, संजय कदम, किशनराव कांगणे,माधव कांगणे,लालू काळे, रवींद्र राठोड यांच्यासह विद्यालयाचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, पाटोदा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

प्रियदर्शनी प्राथमिक शाळा या संस्थेचे सचिव डॉ .योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सरांच्या नियोजनातून, पाटोदा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त वेशभूषा,वकृत्व स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा विविध गुण दर्शन उपक्रम आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी (सोमवार) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ ,स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.श्री . राऊत साहेब, डॉ.श्री .चौरे साहेब , डॉ.श्री सौरभ जाधव हे उपस्थित होते तसेच शाळेतील पालक श्री मिसाळ साहेब, श्री नागरगोजे साहेब, श्रीमती चापकानडे ताई, श्रीमती केदार ताई, श्रीमती क्षीरसागर ताई, श्रीमती अडागळे ताई, श्रीमती अंकुशे ताई यांच्या सह परिसरातील माता पालक यांचीउपस्थिती होती.यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर आधारित मुलांनी भाषणे सादर करून स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व समाजसुधारणेचा संदेश दिला. यानंतर जिजाऊ , स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित घोषवाक्यांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासा बद्दल आदर व सामाजिक जाणीव निर्माण झाली. यानिमित्ताने आयोजित वेशभूषा उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. शाळेच्या आवारात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक गाणी सादर केली... पालकांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमशीलतेचे कौतुक केले. कार्यक्रमांमध्ये डॉक्टर सौरभ जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे नाते म्हणजे जय जिजाऊ जय शिवराय याप्रमाणे हे नाते आहे असे व्यक्त केले या सह शाळेच्या विविध उपक्रमास उपयुक्त अशी मदत देण्याचा मानस व्यक्त केला कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात जिजाऊ, विवेकानंद यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वीर मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती शेलार मॅडम तथा मदतनीस गायके मॅडम तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले शेवटी आभार प्रदर्शन माताडे सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# किल्ले धारूर आगारात इंधन बचत मासिक कार्यक्रम २०२६ चे उद्‌घाटन;उत्कृष्ट चालकाचा सत्कार

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**किल्ले धारूर एसटी आगारात इंधन बचत मासिक कार्यक्रमा अंतर्गतयाचा उद्घाटन सोहळा व उत्कृष्ट चालकांचा सत्कार सोहळा करून मोठ्या उत्साहात इंधन बचत मासिकाचा शुभारंभ करण्यात आला व महिनाभरात उत्कृष्ट काम करणाऱ्या चालकांना पुढेही गौरवण्यात येऊन त्यांना उत्कृष्ट कार्य करण्याचे आवाहन उपस्थीत कर्मचाऱ्यांना करण्यात आले.**

किल्ले धारूर आगारात शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी इंधन बचत मासिक कार्यक्रम २०२६ चे उद्घाटन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आगार प्रमुख नवनाथ चौरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआय चे निर्देशक संतोष घोळक , शेख मुज्जफर तसेच ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे अध्यक्ष डी. बी. मुंडे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. प्रारंभी मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर किल्ले धारूर आगारात उत्कृष्ट केपीटिएल साध्य करणाऱ्या चालक व यांत्रिक कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये चालक तुकाराम आंधळे, आत्मलिंग गुजर, तिडके, सुनील शिरसाठ, फड, मोहन बिक्कड तसेच यांत्रिक कर्मचारी दिनेश कंकाळ व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.या कार्यक्रमास आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक धस , टी. आय. मोदी , नागरगोजे, सोनवणे मॅडम, विटेकर मॅडम यांच्यासह बाळासाहेब सुतार, घोळवे, अशोक चुंचे, सिद्धार्थ वाघमारे, दशरथ शिरसाठ, राजमाने, लकुळ सरवदे तसेच आगारातील मोठ्या संख्येने चालक, वाहक व यांत्रिक कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर शासकीय आय टीआयचे निर्देशक संतोष यांनी आपल्या भाषणात इंधन बचतीचे महत्त्व विशद केले. इंधनाचा योग्य वापर केल्यास महामंडळाची आर्थिक बचत होऊन




सेवा अधिक सक्षम होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे पत्रकार अनिल महाजन यांनी इंधन बचतीवर सखोल मार्गदर्शन करताना सांगितले की, इंधन ही देशाची मौल्यवान संपत्ती असून तिचा अपव्यय थांबवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. इंधन बचत म्हणजेच देशाची प्रगती, असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी घोळक सर यांनी चालक व यांत्रिक कर्मचाऱ्यांना इंधन बचतीसाठी आवश्यक तांत्रिक व व्यवहार्य मार्गदर्शन केले. वाहनांची योग्य देखभाल, वेळेवर दुरुस्ती आणि दक्षता यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन बचत शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात आगार प्रमुख नवनाथ चौरे यांनी चालकांनी इंधन बचतीकडे अधिक गांभीर्याने पाहण्याचे आवाहन केले. फक्त एक लिटर नव्हे, तर इंधनाचा प्रत्येक थेंब वाचवला पाहिजे असे सांगत सर्व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच उत्कृष्ट केपीटीएल आणणाऱ्या चालक व यांत्रिक कर्मचाऱ्यांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले.कार्यक्रमाच्या शेवटी अनिल आढागळे यांनी उपस्थित मान्यवर, कर्मचारी व सहभागी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## पान १ वरून...

### बोगस बियाणे विकणाऱ्यांची

शेतकऱ्यांची दिशाभूल करणाऱ्या कंपन्या आणि डीलर्सच्या मनमानी कारभाराला आळा बसेल. चौहान म्हणाले की, आता प्रत्येक बियाणे कंपनीची नोंदणी केली जाईल, ज्यामुळे कोणती कंपनी अधिकृत आहे हे स्पष्ट होईल. ते म्हणाले, नोंदणीकृत कंपन्यांची माहिती उपलब्ध असेल आणि कोणताही अनधिकृत विक्रेता बियाणे विकू शकणार नाही. यामुळे बाजारातून फसव्या कंपन्या दूर होतील आणि शेतकऱ्यांना योग्य स्त्रोताकडून बियाणे मिळेल.

------------

### लातूरमध्ये विलासराव देशमुखांच्या

(अजित पवार गट) मोठा धक्का बसला असून त्यांना केवळ एका जागेवर विजय मिळवता आला. निवडणुकीपूर्वी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने ही निवडणूक चुरशीची होईल, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, आमदार अमित देशमुख यांनी निवडणुकीची सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन अत्यंत सूक्ष्म नियोजन केले. त्यांच्या या रणनीतीसमोर भाजप आणि राष्ट्रवादीचा प्रभाव फिका पडला. भाजपने आपली सर्व ताकद पणाला लावली होती, तरीही त्यांना २२ पेक्षा जास्त जागा जिंकता आल्या नाहीत. लातूर महापालिकेच्या इतिहासात १९५२ पासून काँग्रेसचेच वर्चस्व राहिले आहे. एप्रिल २०१७ ते नोव्हेंबर २०१९ हा अडीच वर्षांचा अपवाद वगळता लातूरकरांनी नेहमीच काँग्रेसच्या हाताला साथ दिली आहे. या निकालाने लातूर हा आजही काँग्रेसचाच अभेद्य बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. लातूर महानगरपालिकेत ४७ जागांसह काँग्रेस आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे. स्पष्ट बहुमतामुळे आता महापालिकेत काँग्रेसचाच महापौर विराजमान होईल. तर भाजपला २२ जागांसह प्रबळ विरोधी पक्ष म्हणून समाधान मानावे लागले. मागील निवडणुकीच्या तुलनेत पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. तर राष्ट्रवादी काँग्रेस- अजित पवार गटाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले आहे. या विजयानंतर संपूर्ण लातूर शहरात काँग्रेस३ कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत आणि फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

----------

### परभणी मनपावर ठाकरें

(उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने सर्वाधिक जागा जिंकून ठाकरेंचा बालेकिल्ला कायम राखला आहे. ठाकरे गट आणि काँग्रेसच्या महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. परभणी महानगरपालिकेत १६ प्रभागांमधील ६५ जागांसाठी निवडणूक झाली होती. सत्ता स्थापन करण्यासाठी ३३ जागांची गरज असताना, महाविकास आघाडीने बहुमत ओलांडले आहे. शिवसेना ठाकरे गटाने सर्वाधीक १८ जागा जिंकल्या आहेत. तर काँग्रेसचा १२ जागांवर विजय झाला आहे. भाजपला १२ जागा मिळाल्या आहेत तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) १० जागांवर विजयी आहे. अपक्ष ४ जागांवर निवडून आले असून, शिवसेना शिंदे गटाला खातेही उघडता आले नाही. ठाकरे गट आणि काँग्रेस यांनी एकत्रितपणे ३० जागा जिंकल्या असून, फक्त २-३ जागांची गरज पूर्ण होऊन बहुमत सिद्ध होणार आहे. अपक्ष किंवा इतर लहान पक्षांच्या मदतीने ठाकरे गट सत्ता स्थापन करू शकतो. परभणी हा पारंपरिकपणे शिवसेना (ठाकरे) गटाचा मजबूत बालेकिल्ला राहिला आहे. मात्र, मागील काही वर्षांत काँग्रेसने इथे आपली पकड मजबूत केली होती. यंदा ठाकरे गट आणि काँग्रेस यांनी निवडणूकपूर्व आघाडी केली. खासदार संजय जाधव आणि आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या आक्रमक प्रचारामुळे महाविकास आघाडीला मोठा फायदा झाला.

----------------

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात



माजलगाव: नुकत्याच झालेल्या एम.डी.भुलतज्ञ परीक्षेत माजलगावचे डॉ.नवल जेथलिया यांनी घवघवीत यश संपादन करून एम.डी.भुलतज्ञ पदवी मिळविल्याबद्दल त्यांचा मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी माजलगाव येथील डॉ.प्रताप लेंडाळ, डॉ.गिरीश खुर्पे, युवा नेते रोहित वगरे, कलाकार अजय विभुते, शुभम स्वामी, पत्रकार कुणाल दुगड आदी दिसत आहेत.



गेवराई: तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस. यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना राजेंद्र कुऱ्हे, श्याम डाके, प्रदीप जगताप, अभिषेक राऊत, विकास बनसोडे, विलास येडे, शहाजी तेलप, नंदकिशोर उपरे,कसबे एम.एन,श्रीराम कुऱ्हे.

## राज्यस्तरीय विजेता प्रवीण राठोडचा जिल्हा समाज कल्याण कार्यालयात गौरव

किल्ले धारूर । प्रतिनिधी

संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूर, समाज कल्याण विभाग व दिव्यांग कल्याण विभाग यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या प्रवीण शरद राठोड याच्या यशाची दखल आता प्रशासकीय स्तरावरही घेतली जात आहे.



नूतन माध्यमिक विद्यालय व नूतन वसतिगृह अंजनडोह येथील या गुणवंत विद्यार्थ्याचा आज १५ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद बीड येथे जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती मेश्राम एस. एन. यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानतर्फे १५ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील वस्तीगृह व निवासी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये प्रवीणने आपल्या प्रभावी लेखणीच्या जोरावर जिल्ह्यासह राज्यात अव्वल स्थान मिळवून ऐतिहासिक यश संपादन केले. या यशाबद्दल त्याचे कौतुक करण्यासाठी आयोजित सत्कार प्रसंगी समाज कल्याण निरीक्षक नखाते ए. बी., नूतन वसतिगृह अंजनडोहचे संचालक तुळशीदास सोळंके, करंजकर एल. डी., गुनाले , खरसाडे , घुले , पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील एका विद्यार्थ्याने थेट राज्याच्या नकाशावर बीड जिल्ह्याचे नाव सुवर्ण अक्षरात कोरल्याबद्दल श्रीमती मेश्राम मॅडम यांनी प्रवीणचे व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले. प्रवीणच्या या यशाने जिल्हाभरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## मयत गोल्ड लोन कर्जदाराच्या वारसाला तुळजाभवानी अर्बनच्या वतीने इन्शुरन्स क्लेम मंजुर

माजलगाव । प्रतिनिधी

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सो माजलगाव शाखेचे सोनेतारण कर्ज खातेदार आडे एकनाथ मानसिंग यांचे हार्ट अटैक ने निधन झाले असता संस्थेने त्यांच्या गोल्ड लोन कर्जाचा १३५०००/ रुपयांचा इन्शुरन्स मंजूर करून दिले व रक्कम कर्ज खाते जमा करून सोनेतारण तारण खाते बंद करण्यात आले.त्याच्या गहाण ठेवलेले दागिने वारसदार आडे निलाबाई यांच्याकडे सुपूर्त करताना तुळजाभवानी अर्बन चे बीड विभागाचे रिजनल ऑफिसर अमोल बिडवे व गोल्ड लोन अधिकारी लक्ष्मण पवार,प्रकाश शेजुळ व डाके मॅडम

## जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यात यावे -सीईओ जतीन रहमान

**बीड । प्रतिनिधी**

**प्रत्येक विशेष गरजा असणाऱ्या बालकांना गरजेनुसार आवश्यक साहित्य,साधने व इतर उपयोगी साधन,सोयी,उपलब्ध करून त्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण समावेशीत शिक्षणाचा आदीकर प्राप्त करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने१००%प्रयत्न करण्यात येतील असें प्रतिपदान बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहयमान यांनी केले आहे.**



समग्र शिक्षा समावेशीत शिक्षण उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग बालकांसाठी गरजेनुसार आवश्यक शैक्षणिक साह्यभूत साहित्य साधने उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी बीड तालुक्याच्या वतीने मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते,त्या प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुंवर, गटशिक्षणाधिकारी समंदर खान,जिल्हा समन्वयक वसीम खान,अलीमोकोचे डॉ.हितेशकुमार मांझा,इ.उपस्थित होते.

प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे अत्यंत महत्वपूर्ण काम सर्व घटकांनी करावे असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुंवर यांनी या प्रसंगी केले. तर गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांनी प्रत्येक गरजेनुसार विद्यार्थ्यांना अनुकलनिय वातावरणात शैक्षणिक सुविधा मिळाव्यात,सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणीक उपक्रम, शालेय रॅम्प, समाजकल्याण शिष्यवृत्ती साठी अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समग्र शिक्षा सर्व साधनव्यक्ती,केंद्रस्थानी विशेष शिक्षक,जिल्हा कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

## आमदार प्रकाश सोळंके यांचा वाढदिवस 'आनंदग्राम'मध्ये सामाजिक उपक्रमाने साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री माननीय प्रकाश (दादा) सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त, सरपंच केशवराव आंधळे सर यांच्या संकल्पनेतून 'आनंदग्राम' येथे निराधार मुलांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. फूल ना फुलाची पाकळी या भावनेतून मुलांच्या गरजा पूर्ण करत हा वाढदिवस अत्यंत साधेपणाने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा झाला.



या उपक्रमांतर्गत आनंदग्राममधील चिमुकल्यांना बिस्किटे, फ्रुटी, तिळगुळ आणि जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. मकर संक्रांतीचे औचित्य साधून मुलांशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**दत्ताभाऊ बारगजे यांच्या रूपात देवत्व!**

यावेळी आनंदग्राममधील मुलांची परिस्थिती आणि तेथील शिस्त पाहून उपस्थित सर्वांचे मन भरून आले. खरोखरच देव पाहायचा असेल तर आनंदग्रामला जाऊन पहा, दत्ताभाऊ बारगजे यांच्या रूपात तुम्हाला तिथे देव नक्की दिसेल, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. दुःखातही सुख शोधणारी आणि कष्टालाच देव मानणारी ही माणसे समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

आनंदग्राममध्ये निसर्गाचे सानिध्य असले तरी, ऋतूंनुसार येणाऱ्या संकटांशी ही मुले झुंज देत आहेत. उन्हाळ्यातील पाणीटंचाई, पावसाळ्यातील विषारी सरपटणारे प्राणी आणि हिवाळ्यातील कडाक्याची थंडी या सर्वांचा सामना करत येथील मुले आनंदाने जगत आहेत. सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे या उक्तीचा अनुभव येथे येतो, मात्र तरीही येथील मातीचा कणन्कण आनंदाचा सुगंध देत असल्याचे यावेळी आवर्जून नमूद करण्यात आले.

**अन्नदानाचे आवाहन**

समाजातील दानशूर व्यक्तींनी जेव्हा कधी अन्नदान करण्याची इच्छा असेल, तेव्हा आनंदग्राम या ठिकाणी येऊन अवश्य मदत करावी, असे आवाहन या माध्यमातून करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला पिंपळा रुई गावचे सरपंच मा.केशवराव आंधळे सर ,दत्ताभाऊ बारगजे, संध्याताई बारगजे, संतोषराव निकाळजे, वैजेनाथ निर्मळ, नवनाथ मात्रे, लक्ष्मण कोठुळे यांच्यासह आनंदग्राममधील विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी तिळगुळ वाटप करून मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरून...

### पत्रकारिता, अर्थकारण आणि

त्यांनी सांगितले. बदलत्या परिस्थितीत व बदलत्या पत्रकारितेत सत्य, संयम व तत्व टिकवून पत्रकारिता करणे हे अवघड असले तरी त्या उद्देशापासून पत्रकारांनी ढळले नाही पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भारताची अर्थव्यवस्था ही जगात तीन नंबरची अर्थव्यवस्था होत असून भारतासारखी नागरी वस्ती आणि गुण्यागोविंदाने राहणारी संस्कृती जगात कुठेही नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे सर्वच क्षेत्रात बदल घडतात त्याप्रमाणे पत्रकारितेतही बदल घडत आहेत. नकारात्मकता पसरू न देणे ही खऱ्या अर्थाने नव्या बदलत्या युगामध्ये पत्रकारिते समोरील मोठी आव्हाने आहेत. ती सक्षमपणाने पत्रकारांनी पेलली पाहिजेत. भारत आज जगामध्ये अर्थव्यवस्थेत तिसऱ्या क्रमांकावर येत आहे, तांदळाचे उत्पादन जगात दुसऱ्या क्रमांकाचे आहे, गव्हाचे उत्पादन जगात दुसऱ्या क्रमांकाचे आहे, सर्वाधिक उपग्रह सोडणारा देश म्हणून आपली ओळख आहे, शहराच्या आर्थिक उलाढालीपेक्षा आपल्या ग्रामीण भारताची आर्थिक उलाढाल ही प्रगतिशील आहे. त्यामुळे आपण आपल्यालाच स्वतःलाच भाग्यवान समजले पाहिजे. नकारात्मकता सोडून सकारात्मक पद्धतीने आपले गाव, आपले राज्य, आपला देश समृद्ध करण्यासाठी अर्थकारण, राजकारण व पत्रकारिता यांनी हातात हात घालून जबाबदार काम करावे अशीच सजग समाज निर्मितीसाठी अपेक्षा असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमास अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार परिषदेचे तालुका कार्याध्यक्ष संपादक आत्मलिंग शेटे, तालुकाध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष किरण धोंड, तालुका सचिव दिगंबर देशमुख, शहर सचिव माणिक कोकाटे, मार्गदर्शक व सल्लागार प्रा. प्रवीण फुटके, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे परळी तालुका निमंत्रक जगदीश शिंदे, शहर उपाध्यक्ष अभिमान मस्के, तालुका उपाध्यक्ष अनिल गायकवाड, कोषाध्यक्ष संदीप मस्के, परळी शहर कार्याध्यक्ष अनंत कुलकर्णी, परळी शहर कोषाध्यक्ष गणेश आदोडे, कोषाध्यक्ष संतोष बारटक्के, प्रसिद्धी प्रमुख निवृत्ती खटिंग, कुंडलिक लहाने, कैलास डुमणे, पृथ्वीराज मस्के, कार्यकारणी सदस्य विजय रोडे, रमेश लहाने, दत्ता शिवगण, नरसिंग अन्नदास कैलास बजाज, विश्वजीत मस्के, बालासाहेब लोभे यांच्यासह परळीतील मान्यवर पत्रकार धनंजय आढाव, महादेव शिंदे, श्रीराम लांडगे, संजीव रॉय, सचिन मुंडे, भगवान साकसमुद्रे, गंगाखेड येथील पत्रकार संजय सुपेकर आदिसह महिला महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, नागरिक विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड-पालवन-देवराई

घेणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

जि.प.पं.स.निवडणुकीचे श्रेय घेण्यासाठी रस्ता काम सुरु करण्यास विलंब

बीड़-पालवन-देवराई या रस्त्याच्या कामाला कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असतानाही संबंधित गुत्तेदाराकडून जाणीवपूर्वक कामास विलंब केला जात आहे. याबाबत कार्यकारी अभियंता श्री. तोंडे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तक्रार केल्यानंतर संबंधित कन्स्ट्रक्शनवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा शब्द त्यांनी दिला आहे. दरम्यान, या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून सदर रस्त्याचे काम तात्काळ इतर गुत्तेदाराकडे सुपूर्द करावे, अशी मागणी करण्यात येत आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लक्षात घेता, या रस्त्याच्या कामाचे श्रेय घेण्यासाठीच गुत्तेदार मुद्दाम कामास विलंब लावत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

### बीड ते नाळवंडी रस्त्याच्या

लक्ष्मीआई तांडाचे सरपंच स्वरूप राठोड (नाळवंडी), गणेश राऊत, जुजगव्हानचे सरपंच रवी गंगावणे, संजय बापू काळे, आत्माराम सोनवणे, अशोक सोनवणे, नामदेव म्हेत्रे, रोहित राऊत, राघोजी राऊत, राजू पटेल, बाळू आमटे, घोडके, अभिमान गुंदेकर, विकास यादव, प्रशांत जाधव, मधुकर राऊत, दत्तप्रसाद सानप, बाबासाहेब काळे, युनूस शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी पुढील टप्प्यात हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरणाचा करून द्यावा, तसेच या कामासाठी पाठपुरावा करावा, अशीही मागणी केली.

### गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे

पाणी मारणे, रस्त्यावर मुरूम पसरवणे यासारख्या मूलभूत उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. तसेच योग्य सूचना फलक, बॅरिकेड्स व रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था नसल्यामुळे अपघातांची मालिका सुरू आहे. या गंभीर रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करून आवश्यक सूचना फलक, बॅरिकेड्स, रिफ्लेक्टर आणि धूळ नियंत्रणासाठी उपाय करावेत, अपघात व वाढती धूळ याकडे दुर्लक्ष केल्यास ढेकनमोहा येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही माजी सरपंच नागेश शिंदे यांनी दिला आहे.

### माजलगावात श्री विश्वकर्मा

माजलगाव), राधाकृष्ण होके पाटील (माजी आमदार,),जयसिंग सोळंके (माजी जि.प.सदस्य), मोहन जगताप (व्हा.चेअरमन,छ.स.सा.का),अशोक डक (सभापती कृ.उ.बा.स.मुंबई), बाबुराव पोटभरे (संस्थापक, बहुजन विकास मोर्चा),सहाल चाऊस (उपनगराध्यक्ष), रंगराव जाधव (ज्येष्ठ शिवसैनिक), बाबरीसेठ मुंडे (माजी नगराध्यक्ष, वडवणी),शांतीनाथ डोरले (भाजपा सचिव, बीड), कल्याणभाऊ आबुज (माजी जि.प.सदस्य),जयदत्त नरवडे (सभापती, कृ. उ.बा.स.), कृष्णा वल्लभराव चौधरी (युवा उद्योजक), खलील पटेल (रा.कॉं. नेते), नितीन नाईकनवरे (माजी सभापती), गिताराम अनभुले (माजी सरपंच),डॉ. अन्वर पटेल,डॉ. महेश कोळपकर (होमीओ पॅथिक तज्ञ),.राज अर्जुन (सरपंच, चिंचगव्हाण, ज्ञानेश्वर मेंडके (भाजपा नेते), कृष्णकांत कुटे (माजी सरपंच), किशोर फुलसरे (सरपंच) आदींची उपस्थिती लाभणार आहेत.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विश्वकर्मा विठ्ठल-रुक्मिणी प्रतिष्ठान मंडळ, श्री संत ज्ञानेश्वर नगर, भाटवडगाव यांच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे.

## भाग्य बदलण्याची ताकत किसान बाबा व नवनाथ बाबा सारख्या संतात आहे -कविराज महाराज झावरे

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांच्या हस्ते व गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दिनांक १४ जानेवारी बुधवार रोजी द्वितीय कीर्तन रुपी सेवा ह भ प कविराज महाराज झावरे यांनी अर्पण केली



मनुष्याला आपले भाग्य बदलायचे असेल तर संत सेवा करणं ही काळाची गरज आहे संत सेवेमध्ये मनुष्याचे भाग्य बदलण्याची ताकद असते. संत संगतीमुळे जीवनाचे कल्याण होते. संताच्या संगतीत अर्धा क्षण जरी गेला तरी जीवनाचं कल्याण करण्याची ताकद संतामध्ये आहे. मनुष्याच्या आयुष्यात कितीही वाईट परिस्थिति येऊ द्या मनुष्याने संतांची संगती कधी सोडू नये भाग्य बदलण्याची ताकद गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज व शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या सारख्या संतात आहे त्यामुळे मनुष्याने संत सेवा ही करत राहावी असे अभंग विवेचन ह भ प कविराज महाराज झावरे यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहामध्ये द्वितीय कीर्तन रुपी सेवा अर्पण करताना व्यक्त केले

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे हरी किर्तन प्रवचन गाथा भजन ज्ञानेश्वरी पारायण भावार्थरामायण हरीजागर काकडा भजन विष्णुसहस्रनाम अशा विविध खरीच नामस्मरणाच्या भक्तीमय कार्यक्रमाने श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भक्तीचा मळा गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली फुलला आहे. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ह भ प कविराज महाराज झावरे यांच्या किर्तन सर्व वेळी टाळकरी माळकरी विणेकरी मृदुंगाचार्य भजनी मंडळी गायनाचार्य भाविक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाले

## दादा आणि भैय्यांना वाढदिवसानिमित्त राज पाटील यांनी दिले शालेय साहित्य भेट

वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय नेते माजी मंत्री तथा आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब व पुतणे जयसिंग भैया सोळंके यांचा वाढदिवस एका आगळयावेगळया पद्धतीने साजरा करण्यात आला आहे. त्यांना दीड हजार वह्या पुस्तके भेट देऊन आणि संत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आपल्या तीगावातील महिलांना वृक्ष व भेटवस्तू देऊन तसेच १११ मित्र व पत्रकार मित्र परिवारांचा विमा उतरवून वाढदिवस साजरा करण्याचा संकल्प राज पाटील यांनी केला.



लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील हे नेहमीच सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असतात. आपल्या लाडक्या नेत्याचा वाढदिवस एक आगळावेगळा व्हावा अशी त्यांची भावना होती. त्यातच त्यांचे नेते आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी शाल श्रीफळ न देता माझ्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य भेट द्यावे असे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत राज पाटील यांनी सुमारे दीड हजार वह्या पुस्तके घेऊन मित्रपरिवारसह दादांची भेट घेतली. ३० डिसेंबर रोजी जयसिंह भैय्या सोळंके यांचा वाढदिवस होता आणि १४ जानेवारीला प्रकाश दादा यांचा वाढदिवस या दोन्ही वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी एकत्र पद्धतीने दादा आणि भैयांचा सत्कार केला. त्यांना शालेय साहित्य भेट देऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. एवढेच नाही तर वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार आणि मित्रांचा विमा उतरवून एक सामाजिक दायित्व निभवण्याचा निर्णय घेतला. आपल्या नेत्याचा वाढदिवस अशा सामाजिक उपक्रमाने साजरा करण्याचा अभिनव उपक्रम राज पाटील यांनी राबविल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मंगळवारी सायंकाळी राज पाटील यांच्यासह सर्व मित्र परिवार यांनी संयुक्त पद्धतीने पुस्तक भेट देऊन दादांना व भैय्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वीरेंद्र सोळंके, बीड येथील प्राध्यापक सत्यप्रेम मगर, सुरेश माने, हनुमान शेंडगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ता. अध्यक्ष तथा पिंपरखेडचे उपसरपंच अशोक निपटे, मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष सतीश सोनवणे, पत्रकार रामेश्वर गोंडे, पत्रकार हनुमंत म्हात्रे, पत्रकार ओमप्रकाश साबळे, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार ज्ञानेश्वर लंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

## चांगल्या कार्यासाठी आत्मविश्वासाने काम करा -प्राचार्य डॉ.विश्वास कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या हिवाळी शिबिराचा समारोप समारंभ उत्साहात पार पडला सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला या शिबिराचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वासराव कदम सर प्राचार्य डॉ सदाशिवराव सरकटे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक डॉ सुनील राव जाधव डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आधी सभा सदस्य डॉ कल्पना घारगे मॅडम सभापती हनुमंत काळे ज्ञानेश्वर काळे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक प्राध्यापक बापू घोक्षे व्यासपीठावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व शिबीर अहवाल वाचन प्राध्यापक डॉ लोखंडे यांनी केले प्राचार्य डॉ विश्वास कदम यांनी मनोगत व्यक्त करताना चांगल्या कार्यासाठी युवकांनी आत्मविश्वासाने सामोरे जाणे गरजेचे आहे असे मनोगत व्यक्त केले कोणत्याही कार्यासाठी आत्मविश्वास हा अतिशय महत्त्वाचा असल्याचे शिबिर यशस्वी केल्याबद्दल त्यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात स्वयंसेवकांना रवींद्र सिंग टाक कुमारी पायल अनुजा जाधव पार्वती काळे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला या शिबिराच्या माध्यमातून बौद्धिक क्षेत्रात बालविवाह कृषी विषयक कायदे जलसंवर्धन ग्रामीण विकास भाषा संभाषण कौशल्य राष्ट्रीय एकात्मता स्वच्छता अभियान वृक्षारोपण पडीक जमिनीवर चरखतून जलसंवर्धन करण्याचा प्रयत्न करण्यात आला या कार्यक्रमात प्राध्यापक डॉ कल्पना घारगे मॅडम यांनी आपले विचार मांडले या कार्यक्रमात डॉ सुनील जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिबिराच्या माध्यमातून केलेल्या विविध कामाचे अवलोकन करून शिबीर यशस्वी झाल्याचे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमासाठी प्राध्यापक डॉ शिवाजी काकडे डॉ प्राध्यापक रामकृष्ण प्रधान प्राध्यापक भगत डॉ नारायण फुने डॉ झेड सिद्दिकी प्राध्यापक पापाजी चव्हाण शाळेचे मुख्याध्यापक श्री राख सर श्री सोनवणे सर श्री दीपक जावळे ज्ञानेश्वर काळे ईश्वर काळे महादेव काळे बंडोपंत काळे उत्तम काळे उमाजी काळे यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे यांनी मानले राष्ट्रगीताने शिबिराची सांगता करण्यात आली.

## प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरित्राचे स्मरण केल्यास समाजातील व्यक्तींच्या जीवनावर चांगले परिणाम घडतात -महंत मंदार महाराज रामदासी

आष्टी । प्रतिनिधी

प्रभू श्री रामचंद्र यांचे चरित्र म्हणजे श्रीरामाच्या जीवनातील आदर्श मूल्यांचा, कर्तव्यनिष्ठतेचा, त्यागाचा आणि मानवतावादी दृष्टिकोनाचा सार आहे. या प्रभू रामचंद्राचे चरित्राचे सतत स्मरण केल्यास समाजातील व्यक्तींच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर चांगले परिणाम घडून येऊ शकतात असे प्रतिपादन दादेगाव येथील स्वामी देवदास मठाचे महंत मंदार महाराज रामदासी यांनी केले.



आष्टी येथील आमदार सुरेश धस यांचे वतीने आयोजित श्रीराम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यामध्ये पाचव्या दिवशी चे निरूपण करताना ते बोलत होते. आज या राम कथेचे श्रवण करण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे माजी आमदार साहेबराव दरेकर आष्टी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुखलाल मुथा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संपत शेळके यांचे सह आष्टीतालुक्यातील संत महंत प्रवचनकार कीर्तनकार उपस्थित होते.

पुढे बोलताना महंत मंदार महाराज म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र हे सत्यधर्म, करुणा, संयम आणि न्याय यांचे प्रतीक आहेत त्यांच्या चरित्राचे स्मरण केल्यामुळे व्यक्तींमध्ये प्रामाणिकपणा, कर्तव्य भावना, आणि सदाचार रुजतो त्यामुळे समाजातील अनैतिक कृती कमी होण्यास मदत होते. प्रभू रामचंद्र यांनी राजपुत्र असूनही वडिलांचे वचन पाळण्यासाठी वनवास स्वीकारला या प्रसंगाचे स्मरण व्यक्तींना स्वतःच्या जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडण्याची प्रेरणा देते त्यामुळे कुटुंब आणि कार्यक्षेत्र व समाजातील शिस्त आणि विश्वास वाढतो तसेच प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरित्रामध्ये सर्वांशी समान वागणूक देण्याचा संदेश आहे. प्रभू रामचंद्रांनी शबरी, निशाद राज यांच्यासारख्या सर्व स्तरातील लोकांना मानसन्मान दिला त्यामुळे समाजात जात वर्ग किंवा आर्थिक भेदभाव कमी होऊन समतेची भावना बळकट होत असते त्याचबरोबर प्रभू रामचंद्र यांच्या चरित्रामध्ये आदर्श नेतृत्वाची प्रेरणा म्हणून रामराज्य ही संकल्पना सुशासन लोककल्याण आणि न्यायावर आधारित आहे प्रभू श्रीरामचंद्रांचे चरित्राचे स्मरण व्यक्तीच्या मनाला स्थैर्य व शांती देते त्यामुळे तणाव द्वेष आणि हिंसक वृत्ती कमी होऊन सकारात्मक विचारसरणी वाढत असते त्यामुळे श्री प्रभू रामचंद्र यांचे सतत स्मरण केल्यास व्यक्तींच्या आचार विचारात राहून समाज अधिक सुसंस्कृत नैतिक आणि सुसंघटित बनतो त्यामुळे प्रभू रामचंद्राचे चरित्र हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून समाज उन्नतीसाठी मार्गदर्शक तत्वांचा अमूल्य ठेवा आहे असेही त्यांनी शेवटी सांगितले आज या श्रीराम कथेमध्ये सीता स्वयंवर हा सोहळा साजरा करण्यात आला यावेळी प्रत्यक्ष प्रभु श्रीरामचंद्र आणि सीता यांच्या वेशभूषेमध्ये कलाकारांनी आपली कला सादर केली आष्टी तेथील व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना या राम कथेमध्ये आजच्या कीर्तनकार प्रवचनकार या संत महानताच्या सत्काराचा मान प्रदान करण्यात आला होता या राम कथेला अष्टीकर नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिलेला आहे.

# पीएम किसान योजनेची रक्कम १० हजार होणार?

## बजेट २०२६ मध्ये शेतकऱ्यांना मोठी भेट मिळण्याची शक्यता

पुणे : केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ सादर होण्यास आता काहीच दिवस उरले आहेत. त्यामुळे देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांचे लक्ष या बजेटकडे लागून राहिले आहे. वाढती महागाई, शेतीसाठी लागणारा वाढता खर्च आणि अनिश्चित हवामान यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहेत.

अशा परिस्थितीत सरकारकडून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेबाबत यंदाच्या बजेटमध्ये महत्त्वाची घोषणा होऊ शकते, अशी चर्चा सुरू आहे. सध्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाला ६,००० रुपये आर्थिक मदत दिली जाते.

ही रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. मात्र आजच्या वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही मदत अपुरी असल्याचे अनेक शेतकऱ्यांचे मत आहे. त्यामुळे बजेट २०२६ मध्ये ही रक्कम वाढवून १०,००० रुपये करण्याची मागणी जोर धरत आहे. शेतीचा खर्च गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जमिनीची मशागत, बियाणे,



रासायनिक व सेंद्रिय खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी आणि शेतीसाठी लागणारी अवजारे यांचे दर प्रचंड वाढले आहेत. याशिवाय हवामानातील बदलांमुळे उत्पादनावरही परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत वर्षाला मिळणारी ६,००० रुपयांची मदत शेतकऱ्यांच्या गरजांच्या तुलनेत खूपच कमी ठरते. जर ही रक्कम वाढवण्यात आली, तर शेतकऱ्यांना शेतीत योग्य गुंतवणूक करता येईल आणि उत्पादन खर्च भागवण्यास मदत होईल. किसान योजनेतील रक्कम वाढल्यास त्याचा फायदा केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहणार नाही. शेतकऱ्यांच्या हातात जास्त पैसा आल्याने त्यांची खर्च करण्याची क्षमता वाढेल. यामुळे बियाणे, खत, अवजारे, दैनंदिन गरजा यांवर होणारा खर्च वाढेल आणि त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होईल. ग्रामीण भागातील बाजारपेठांना चालना मिळेल आणि रोजगाराच्या संधीही वाढू शकतात.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना डिसेंबर २०१८ मध्ये केंद्र सरकारने सुरू केली होती. या योजनेचा मुख्य उद्देश लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा आहे. आज या योजनेचा लाभ देशभरातील कोट्यवधी शेतकरी घेत आहेत.

थेट बँक खात्यात पैसे जमा होत असल्याने ही योजना पारदर्शक आणि प्रभावी मानली जाते.आता सर्वांचे लक्ष बजेट २०२६ कडे लागले आहे. सरकार शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर खरे उतरेल का, किसान योजनेतील रक्कम वाढवली जाईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जर ही घोषणा झाली, तर ती शेतकऱ्यांसाठी मोठी खुशखबर ठरेल, यात शंका नाही.

## मक्याच्या दाण्यांपासून करा चारा निर्मिती!



सद्या हिरवा चारा उपलब्ध होत असल्याने चाऱ्याचा प्रश्न काहीसा मिटला आहे. परंतु दुभत्या जनावरांना हिरवा चारा आरोग्यासाठी आवश्यक आहे. हिरव्या चाऱ्याला पर्याय म्हणून ग्रामीण भागातील काही पशुपालक मक्याचे दाणे भिजवून हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती करण्यास प्राधान्य देत आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी अशा पद्धतीने चारा निर्मितीचे तंत्र अवलंबिले जाते.

कशी करायची चारा निर्मिती?

काही ठिकाणी तयार केलेल्या चारा पद्धतीनुसार, मक्याच्या दाण्यांना २४ तास भिजत ठेवा. २४ तासानंतर हे दाणे गोणपाटात काढून घेतल्यानंतर त्याला मोड येतात. यानंतर मोड आलेले मक्याचे दाणे घरात सात ते आठ मातीच्या मोठ्या टोपल्या आणि प्लास्टिक ट्रे यात माती टाकून पेरून ठेवा. एका ठिकाणी ४०० ग्रॅम मका पेरून त्याला दररोज दर दोन तासाने पाणी द्यावे, यातून एका आठवड्यात हा चारा वाढून पुढे १२ दिवसांत त्याची संपूर्ण वाढ होईल. एका ट्रेमध्ये साधारण सहा किलोपेक्षा अधिक चारा उपलब्ध होईल.

वेळ, पाणी अन् जागेचीही बचत : या चाऱ्यामध्ये पौष्टिक प्रथिने, कर्बोदके, चवदार जीवनसत्त्व, सूक्ष्म अन्न घटकांचे प्रमाण भरपूर आहे. कमी पाणी लागत असल्यामुळे हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. यामुळे कमी जागेत कमी खर्चात सगळ्या प्रकारच्या हवामानात वर्षभर चारा उत्पादन करणे शक्य आहे. भरडलेल्या धान्यापेक्षा पौष्टिक : दुभत्या जनावरांना चारा म्हणून भरडलेले धान्य मोठ्या प्रमाणात दिले जाते. मात्र, पशुपालकांनी शोधलेल्या हायड्रोफोनिक चारानिर्मिती तंत्राच्या माध्यमातून केली जाते. हा चारा भरडलेल्या धान्यापेक्षा सुद्धा पौष्टिक आहे. शंभर टक्के सेंद्रिय, शेळ्यांनाही उपयोगी : चारा तयार करण्यासाठी कोणतेही रासायनिक खत किंवा औषध वापरले जात नसल्याने हा चारा १०० टक्के सेंद्रिय आहे. हा चारा शेळ्या आवडीने खात असून, यामुळे शेळीचे आरोग्य चांगले राहते.

## ट्रॅक्टर खरेदीवर मिळते ३.१५ लाख रुपयांचे अनुदान!

शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री दिवसेंदिवस महाग होत चालली आहे. विशेषतः ट्रॅक्टरसारख्या महत्त्वाच्या साधनासाठी मोठा खर्च करावा लागतो. मात्र आता महिला शेतकरी आणि महिला बचत गटांसाठी एक अतिशय दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत तब्बल ९० टक्के अनुदानावर मिनी ट्रॅक्टर देण्याची योजना राबवली जात आहे. त्यामुळे अनेक महिलांना शेतीकामात स्वावलंबी होण्याची मोठी संधी मिळणार आहे.ही योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राबवली जाते.



८ मार्च २०१७ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील महिला बचत गटांना या योजनेचा लाभ दिला जातो. या अंतर्गत ९ ते १८ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर आणि त्यासोबत लागणारी उपसाधने खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली जाते. महिलांना शेतीत आधुनिक साधनांचा वापर करता यावा आणि त्यांचे उत्पन्न वाढावे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेत असे मिळते अनुदान : या योजनेतील अनुदानाचे गणित अतिशय सोपे आहे. ट्रॅक्टर आणि उपसाधनांच्या खरेदीसाठी एकूण कमाल मर्यादा ३ लाख ५० हजार रुपये इतकी ठेवण्यात आली आहे. यापैकी सरकारकडून ९० टक्के म्हणजेच सुमारे ३ लाख १५ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. बचत गटाला स्वतःच्या खिशातून फक्त १० टक्के म्हणजे साधारण ३५ हजार रुपये भरावे लागतात. ही रक्कम समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांच्या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी लागते. ट्रॅक्टर खरेदी करताना पहिल्या टप्प्यात ५० टक्के अनुदान मिळते, तर उर्वरित ५० टक्के अनुदान ट्रॅक्टरची आरटीओकडे नोंदणी पूर्ण झाल्यानंतर खात्यात जमा केले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अटी आणि पात्रता निकष आहेत. अर्ज करणारा बचत गट नोंदणीकृत महिला बचत गट असणे आवश्यक आहे. त्या बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असावेत. तसेच बचत गटाचे बँक खाते आधार कार्डशी जोडलेले असणे गरजेचे.

## उन्हाळी सोयाबीन बीजोत्पादन तंत्रज्ञान

आगामी सोयाबीन हंगाम यशस्वी व्हावा याकरिता उन्हाळी सोयाबीन बीजोत्पादन तंत्रज्ञान याबाबतची माहिती मराठवाडा कृषी विद्यापीठामार्फत देण्यात आली आहे. उन्हाळी सोयाबीनचे उत्पादन खरीप हंगामासारखे होत नाही. दाण्याचा आकार लहान असतो. १०० दाण्याचे वजन ८ ते १० ग्रॅम असते. उन्हाळी सोयाबीनचा हंगाम फक्त घरच्याघरी बीजोत्पादन करण्यासाठी चांगला आहे.

पाणी : उगवणीसाठी पेरणीनंतर ५ दिवसांनी पुन्हा तुषार सिंचनाने हलके पाणी द्यावे. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने तसेच मार्च व एप्रिल महिन्यात ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. सोयाबीनमध्ये रोप, फुलोऱ्याची व शेंगा भरण्याची अवस्था या पाण्याच्या संवेदनशील असल्यामुळे या कालावधीत पाटाने पाणी द्यावे ज्या शेतातोपान घ्यावयाचे आहे त्यात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. पीक पेरणी ते काढणी या कालावधीत साधारणतः जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० पाणी पाळ्यांची आवश्यकता आहे.

भेसळ काढणे : सोयाबीन पिकामध्ये झाडांची उंची, पानांचा आकार, झाडावरील लव, पान, खोड व फुलांचा रंग इत्यादी लक्षणानुसार भेसळ ओळखून पीक फुलात असतांना व काढणीच्या वेळेस भेसळ ओळखून, भेसळीचे झाडे काढून टाकावी. एका प्लॉटमध्ये सोयाबीनच्या दोन वाणांचे बीजोत्पादन घेतले तर दोन वाणांमध्ये ५ मिटरचे विलगीकरण अंतर ठेवावे.

पीक संरक्षण : उन्हाळी सोयाबीन पिकावर



पाने पोखरणारी अळी, वाटाण्यावरील शेंगा पोखरणारी अळी, खोडमाशी, तंबाखूवरील पाने खाणारी अळी, घाटे अळी तसेच पांढरी माशी तुडतुडे इ . किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडींच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस ५० % ईसी (२० मिली), लॅबडा सायहॅलोथ्रीन ४.९ ० % सीएस (६ मिली इमामेक्टिन बेझोएट १.९ ० % ईसी (८.५० मिली), इंडोक्झाकार्ब १५.८० % ईसी (७ मिली) फ्लुबेडियामाइड ३ ९ .३५ एम एम एससी (३ मिली), क्लोरॅट्रानिलीप्रोल १८.५० % एससी (३ मिली), यमियोक्झाम १२.६० % बडा सायहॅलोथ्रीन ९.५० % शेडसी (२.५ मिली किंवा नोव्हान ५.२५ + इंडोक्झाका ४.५० % एससी (१७ मिली) या कीटकनाशकांचा वापर करावा.

पीक संरक्षण : उन्हाळी सोयाबीन पिकावर रोगांचा प्रादुर्भाव फारसा होत नाही. परंतु येलो व्हेन मोझेक या विषाणू रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळून आल्यास उपटून नष्ट करावी. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव वाढल्यास या रोगाचा प्रसार वेगाने होतो. त्यामुळे पांढऱ्या माशीचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी पायमिथोक्झाम १२.६० % लंबा सायहॅलोथ्रीन ९.५० % झेडसी (२.५ मिली) किंवा बिटामायफ्लुथ्रीन ८.४ ९ % + इमिडाक्लोप्रीड १९.८१४ (७.० मिली) या कीटकनाशकांचा वापर करावा. सदर या कीटकनाशकांचे प्रमाण हे १० लीटर पाणी (साधा पंप) यासाठी असून पॉँचर स्प्रे साठी कीटकनाशकाची मात्रा तीनपट. काढणी व मळणी : शेंगा पिवळया पडून पक्व होताच पिकाची काढणी करावी. कापणीनंतर पिकाचे छोटे छोटे ढीग करून २-३ दिवस उन्हात चांगले मळणी यंत्राची गती कमी करून मळणी करावयाच्या बाह्य आवरणाला इजा पोहचणार नाही याकडे लक्ष द्यावे. मळणी करतांना बियाण्यातील आर्द्रता १४ टक्के पर्यंत असेल तर मळणी यंत्राच्या फेऱ्यांची गती ४०० ते ५०० फेरे प्रति मिनट इतकी ठेवावी. पाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण १३ टक्के पर्यंत असेल तर गत ३०० ते ४०० फेरे प्रति मिनीट इतकी ठेवावी. साधारणत: उन्हाळी हंगामामध्ये तयार झालेल्या रंग हिरवट असतो. साठवण : मळणी नंतर बियाणे ताडपत्री / सिमेंटच्या बळावर पातळ पसरू ल आर्द्रतेचे प्रमाण १० ते १२ टक्के बियाणे स्वच्छ करून पोत्यात भरून साठवण करावी साठवणीचे ठिकाण थंड , ओलावारहित व हवेशीर असले पाहिजे एकावर एक चार पेक्षा जास्त पोती ठेवू नये. उत्पादन : उन्हाळी सोयाबीनचे एकरी ३ ते ५ पर्यंत सरासरी उत्पादन येऊ शकते.




### जागतिक दिवस
### जागतिक धर्म दिन

### महत्वाच्या घटना

१६०१ : आजच्या दिवशीमुघल सम्राट अकबरने असीरगढ येथे असलेल्या किल्यात प्रवेश केला.
१७७३ : कॅप्टन जेम्स कुक यांनी अंटार्क्टिक वृत्त पार केले.
१८७४ : चँग आणि एंग (बंकर) या प्रसिद्ध सयामी जुळ्यांचा मृत्यू. (जन्म:११ मे १८११)
१९१२ : रॉबर्ट फाल्कन स्कॉट दक्षिण ध्रुवावर पोहचले.
१९४१ : नेताजी सुभाष चंद्र बोस ह्यांचे जर्मनी ला प्रयाण
१९४५ : दुसरे महायुद्ध - रशियन फौजांनी पोलंडमधील वॉर्सा शहर उद्ध्वस्त केले.
१९४५ : भारतीय चित्रपटाचे गीतकार आणि स्क्रिप्ट लेखक जावेद अख्तर यांचा जन्म.
१९४६ : संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची पहिली बैठक झाली.
१९५६ : बेळगाव, कारवार आणि बिदर या जिल्ह्यांतील मराठी भाग त्या वेळच्या म्हैसूर राज्यास जोडण्याची घोषणा
१९८५ : इंग्लंड विरुद्ध माजी भारतीय कर्णधार मो.अझरूद्दीन यांनी दुसरे टेस्ट अर्धशतक मारले.
१९८९ : जे. के. बजाज हे उत्तरी ध्रुवावर जाणारे पहिले भारतीय ठरले.
२००१ : अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील 'सूर्या पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले यांना जाहीर.
२००१ : कथ्थक नृत्यांगना डॉ. रोहिणी भाटे यांना मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान जाहीर.
२००७ : ऑस्ट्रेलिया चे प्रसिद्ध क्रिकेटर माइकल बेवन यांनी आंतराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.
२००९ : भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस रणधीर सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७१ : भारताचे महान सम्राट कृष्णदेवराय यांचा जन्म.
१७०६ : बेंजामिन फ्रँकलिन - अमेरिकन संशोधक आणि मुत्सद्दी (मृत्यू:१७ एप्रिल १७९०)
१८८८ : प्रसिद्ध हिंदी साहित्यिक बाबु गुलाबराय यांचा जन्म.
१८९५ : विठ्ठल दत्तात्रय तथा वि. द. घाटे - लेखक व शिक्षणतज्ज्ञ, रविकिरण मंडळातील एक कवी (मृत्यू:३ मे१९७८)
१९०५ : दत्तात्रय रामचंद्र कापरेकर - गणितज्ञ (मृत्यू: १९८६)
१९०६ : शकुंतला परांजपे - कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात अनन्यसाधारण कार्य केलेल्या समाजसेविका (मृत्यू: ३ मे२०००)
१९०८ : अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ 'एल. व्ही. प्रसाद' - चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २२ जून १९९४)
१९१७ : एम. जी. रामचंद्रन - अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (मृत्यू:२४ डिसेंबर १९८७)
१९१८ : सईद अमीर हैदर कमाल नक्वी ऊर्फ 'कमाल अमरोही' - चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, संवादलेखक, पटकथाकार व कवी (मृत्यू:११ फेब्रुवारी १९९३)
१९१८ : रुसी मोदी - टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पद्मभूषण (१९८९) (मृत्यू:१६ मे२०१४)
१९३२ : मधुकर केचे - साहित्यिक (मृत्यू: २५ मार्च१९९३)
१९४२ : मुहम्मद अली ऊर्फ कॅशिअस क्ले - अमेरिकन मुष्टियोद्धा. अमेरिकन वर्णभेदाचा निषेध म्हणून त्याने धर्मांतर करुन मुहम्मद अली हे नाव स्वीकारले.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५६ : हुमायून दुसरा मुघल सम्राट (जन्म: ७ मार्च १५०८)
१७७१ : गोपाळराव पटवर्धन पेशव्यांचे सरदार (जन्म: )
१८९३ : रुदरफोर्ड हेस अमेरिकेचे १९ वा राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ आक्टोबर १८२२)
१९३० : अँजेलिना येओवार्ड ऊर्फ 'गौहर जान' गायिका व नर्तिका (जन्म: २६ जून १८७३)
१९५१ : प्रसिद्ध साहित्यकार ज्योति प्रसाद अग्रवाल यांचे निधन
१९६१ : पॅट्रिक लुमूंबा कॉँगोचे पहिले पंतप्रधान (जन्म: २ जुलै १९२५)
१९७१ : बॅ. नाथ पै स्वातंत्र्य सैनिक व घटनातज्ञ (२५ सप्टेंबर १९२२)
१९८८ : लीला मिश्रा अभिनेत्री (जन्म: ? ? १९०८)
१९९५ : डॉ. व्ही. टी. पाटील ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक
२००० : सुरेश हळदणकर गायक आणि अभिनेते
२००५ : चीनचे राष्ट्राध्यक्ष झाओ झियांग यांचे निधन.
२००८ : रॉबर्ट जेम्स तथा 'बॉबी' फिशर अमेरिकन बुद्धिबळपटू व ग्रँडमास्टर (जन्म: ९ मार्च १९४३)
२०१० : ज्योति बसू प. बंगालचे मुख्यमंत्री (जन्म: ८ जुलै १९१४)
२०१३ : ज्योत्स्ना देवधर मराठी व हिन्दी लेखिका आणि आकाशवाणी निर्मात्या (जन्म: २७ फेब्रुवारी १९२६)
२०१४ : रमा दासगुप्ता तथा सुचित्रा सेन बंगाली व हिन्दी चित्रपट भिनेत्री. उत्तमकुमारबरोबर त्यांची जोडी बंगाली चित्रपटांत चांगलीच गाजली. (जन्म: ६ एप्रिल १९३१ पाबना, पाबना, बांगला देश)
२०१४ : ला भारतीय उद्योजक सुनंदा पुष्कर यांचे निधन.

# पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला १५ जण जखमी; महानगरपालिकाने कुत्रा पकडला

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात गुरुवारी सुरू असलेल्या महानगरपालिका मतदानाच्या दिवशी एक धक्कादायक घटना घडली. मतदानासाठी घराबाहेर पडलेल्या मतदारांवर एका पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक हल्ला चढवला. या घटनेत १० ते १५ नागरिक जखमी झाले असून, सर्व जखमींवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेसंदर्भात महानगरपालिकाचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांना विचारले असता ते म्हणाले की घटनेची माहिती समजतात तत्काळ पिसाळलेला कुत्र पकडण्यात आले तसेच सदरील कुत्र्याला रेबीजचे लक्षण असल्याचे दिसून आले अशी माहिती श्री अर्जुन गिराम यांनी दिली.



ही घटना दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास घडली. शहरातील सरस्वती भुवन परिसर, शनी मंदिर परिसर तसेच काली मशीद परिसरात मतदानासाठी बाहेर पडलेल्या मतदारांवर व स्थानिक नागरिकांवर या पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक हल्ला केला. काही क्षणांतच मतदान केंद्रा परिसरात एकच गोंधळ उडाला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, या कुत्र्याने एका मागोमाग एक नागरिकांवर हल्ला करत अनेकांना चावा घेतला. काही जखमींच्या पायाला गंभीर जखमा झाल्या असून, एका व्यक्तीच्या हाताची करंगळी कुत्र्याच्या चाव्यामुळे गंभीररीत्या जखमी झाली आहे. विशेष म्हणजे, या घटनेत एका लहान मुलालाही कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती समोर आली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात उपचारासाठी मोठी गर्दी झाली होती. सध्या सर्व जखमींवर आवश्यक वैद्यकीय उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जखमींना रेबीज प्रतिबंधक लसीकरण देण्यात येत आहे. या घटनेमुळे संबंधित परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून मतदानासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, महापालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन संबंधित पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा, तसेच शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. सदरील सदरील कुत्रे पकडणे एजन्सी चे काम मंद गतीने सुरू असल्याचे यावरून दिसून येत आहे. मतदानासारख्या महत्त्वाच्या लोकशाही प्रक्रियेच्या दिवशी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने याबाबत तात्काळ ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अवमान प्रकरणी राधेश्याम अट्टलसह ट्रस्टींना नोटीस

## लक्ष्मीनारायण मंदिर प्रकरणात कायदेशीर कारवाई निर्णायक टप्प्यात

बीड । प्रतिनिधी

गेवराई येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर हे नोंदणीकृत सार्वजनिक न्यास असून, या न्यासाच्या मालकीची मौजे कोल्हेर व मौजे लुकामसला येथे एकूण १२१ एकर जमीन आहे. मौजे कोल्हेर येथील जमीन सर्व्हे नं. ६ व ८ तर मौजे लुकामसला येथील जमीन सर्व्हे नं. ३३ व ३८ अशी नोंद आहे. सदर जमीन देवस्थानच्या मालकीची असताना तिच्या उत्पन्नाचा लाभ देवस्थानाऐवजी खाजगी व्यक्तींच्या खात्यात जात असल्याचे गंभीर आरोप यापूर्वी समोर आले होते.

या कथित भ्रष्टाचारासंदर्भात रामनाथ खोड यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीवर धर्मदाय उप आयुक्त यांनी आदेश पारित केले होते. या आदेशाला मा. उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. मात्र मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी धर्मदाय उप आयुक्त यांच्या आदेशाला स्थगिती देत, मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बीड यांनी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी दिलेला आदेश कायम ठेवला. सदर निर्णय मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये स्पष्ट केला आहे. असे असतानाही न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन करून देवस्थान जमिनीतील ऊस परस्पर तोडून कारखान्याला घालण्यात आल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयीन आदेशाचा अवमान झाल्याचा ठपका ठेवत धर्मदाय प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. या अवमान प्रकरणी राधेश्याम अट्टल यांच्यासह संबंधित ट्रस्टींना अधिकृत नोटीस बजावण्यात आली असून, महाराष्ट्र सार्वजनिक न्यास व्यवस्थापन अधिनियम, १९५० अंतर्गत पुढील कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे ''रामनाथ खोड दिशाभूल करत आहेत'' असा दावा करणारे आरोप पूर्णतः फोल ठरले असून, संपूर्ण प्रकरण न्यायालयीन आदेश व दस्तऐवजांच्या आधारे पुढे सरकत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणामुळे सार्वजनिक न्यासांच्या मालमत्तेचे संरक्षण तसेच न्यायालयीन आदेशांच्या काटेकोर अंमलबजावणीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# पैसा व गुंडशाहीपुढे, शहाणपण चालत नाही

## इंदोरीकर महाराज यांनी दिला सल्ला

अहिल्यानगर । प्रतिनिधी

समाज जात अन्? धर्मात गुंतलेला असून पैसा, गुंडशाही, सत्तेपुढे अध्यात्मिक ज्ञानेश्वरी, गाथा अन्? विद्वत्ता, शहाणपण चालत नाही. जीवनात सर्वाला माफी असून कर्माला माफी नाही, असे प्रतिपादन समाजप्रबोधनकार इंदोरीकर महाराज देशमुख यांनी श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथील धर्मनाथ बीज उत्सव सोहळा किर्तनातून उपस्थित भाविकांना उपदेश करताना केले. श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान भामाठाण येथे सुरू असलेल्या धर्मनाथ बीज उत्सव सोहळ्यात काल गुरुवार दि.१५ रोजी सकाळी १०.३० वाजता निवृती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे हजारो महिला, पुरुष अबालवृद्ध भाविकांच्या उपस्थितीत कीर्तन पार पडले. काकडा मालिकेतील तिसऱ्या अभंगावर भाविकांसमोर उपदेश करताना महाराज पुढे म्हणाले, संत मालिकेतील निवत्तीनाथ हे पहिले संत होय.

संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर, संत सावता महाराज आदी संतानी जाती धर्माच्या पलीकडे जाऊन विशिष्ट एका जातीला नव्हे. तर सर्व समावेशक जातीच्या समाजाला आपल्या अभंगवाणीतून उपदेश केलेला आहे. रावणाची सोन्याची लंका जळून भस्म झाली. धृतराष्ट्राची काय अवस्था झाली. पुण्य केलं की स्वर्ग पाप केले की नर्क या उक्तीप्रमाणे माणूस जीवनाकडे पाहतो. महाराजांनी पापाचे शुभअशुभ सोळा प्रकार सविस्तर विशद केले. जिवनात सर्वाला माफी असून कर्माला माफी नाही. कार्यक्रमच होणार. हा विचार समोर ठेवून हसत हसत जीवन जगा. अंगातली ताकद अन्? खिशातला पैसा संपला की, माणसाची वाट लागते. नितीवान माणूस गरीब राहीला तरी सुखाने जगू शकतो. मला एका तज्ज्ञाने प्रश्न विचारला आयुष्यभर हरिनाम भजन केलेले वयोवृद्ध भजनी उतार वयात वेड्या सारखे वागतात. मी अभ्यास करून उत्तर दिले. उतार वयात वेड्यासारखे करणारे भजन्यांनी भजनाच्या मध्यांतरात चहापान करतांना भजनावर अभंगावर चर्चा न करता. गावच्या घडामोडी कुडाळ्या यावर जास्त चवीने चर्चा केली. अशांच्या वाट्याला पुण्य कमी अन्? पाप जास्त आल्याने ते उतारवयात वेड्यासारखे करतात, असे ते म्हणाले. मी, सद्यस्थिती मर्मावर बोट ठेवून बोलतो त्यामुळे माझे बोलणे नेमके झोंबते. लोक गोड बोलुन जे करायचे ते करतात त्यांची समाज वाहवा करतो. माझं वक्तव्य झोंबणारे लोक माझा कार्यक्रम करतात. मी बत्तीस वर्षांपूर्वी तळमळीने पोटतिडकीने समाजहितासाठी सांगितलेल्या गोष्टी समाजाने मनावर घेतल्या नाहीत. ज्यांनी अंगिकारल्या नाहीत ते आता पश्चात्ताप करत असल्याचे शेवटी इंदोरीकर महाराज म्हणाले.

# महानगरपालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयाबद्दल बीडमध्ये जल्लोष

बीड। प्रतिनिधी

भाजपने मुंबई, पुणे, पिंपरी -चिंचवडसह महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिकांवर झेंडा फडकावत मोठे व ऐतिहासिक यश संपादन केले आहे. या दणदणीत विजयाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील भाजपच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त केला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नावाच्या जोरदार घोषणा देत विजयाचा उत्साह साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, ''हा विजय म्हणजे भाजपच्या विकासाभिमुख नेतृत्वावर तसेच लोककल्याणकारी धोरणांवर जनतेने टाकलेली ठाम विश्वासाची मोहर आहे.'' याच कार्यक्रमात अखिल भारतीय विमुक्त घुमंतू जनजाती महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ.लक्ष्मण जाधव आणि भाजपचे नवनिर्वाचित स्वीकृत सदस्य गोविंद शिराळे यांचेही अभिनंदन केले. याप्रसंगी भाजपा बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, रविंद्र कदम, अजय सवाई, विक्रांत हजारी, सुंदर चव्हाण, गणेश लांडे, संग्राम बांगर, शांतीनाथ डोरले, डॉ.अभय वनवे, दत्ता गायकवाड, राजू शहाणे, महादेव नागरगोजे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरमध्ये भाजपा- राष्ट्रवादीचीच सत्ता! आ. संग्राम जगताप व डॉ. सुजय विखे पाटील ठरले जायंट किलर

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

महापालिका निवडणुकीत अपेक्षीत असाच निकाल लागला. ६८ नगरसेवक संख्या असणाऱ्या नगर महापालिकेत राष्ट्रवादी अजित पवार गटाला सर्वाधिक २७ जागा मिळाल्या तर भाजपाला २५ जागा मिळाल्या. दोघांनी मिळून ५२ जागांवर विजयी संपादन केला. दुसरीकडे स्वबळावर लढणाऱ्या एकनाथ शिंदे शिवसेनेला १० जागा मिळाल्या. एमआयएम आणि काँग्रेसला प्रत्येकी दोन, बसपा आणि ठाकरे सेना प्रत्येकी जागा जागेवर विजयी झाली. आ. संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील या दोघांनी घेतलेली अथक मेहनत फळाला आली आणि हे दोघेही या निवडणुकीचे जायंट किलर ठरले. सर्वाधिक नाचक्की आली ती राष्ट्रवादी शरद पवार गटावर. खा. निलेश लंके यांनी या निवडणुकीत शहरात तळ ठोकला असताना त्यांना खाते देखील उघडता आले नाही. शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी शहरातील ठाकरे शिवसेना संपविण्याची सुपारी पूर्ण केली. योगीराज गाडे हे शिवसेना ठाकरे गटाचे एकमेव नगरसेवक निवडून आले असले तरी त्यांचे व्यक्तीगत क्रेडीट आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला असणाऱ्या नगर शहरात सेनेची ताकद मोठी होती. स्व. अनिल राठोड यांच्या नावावर मतांचा जोगवा मागताना त्यांच्याच मुलाला उमेदवारीसाठी अर्ज करण्यास शहर प्रमुख किरण काळे यांनी भाग पाडले. येथेच मोठी गडबड झाली. शिवसैनिकांपेक्षा नगरमध्ये राठोड यांना माननारा वर्ग आजही मोठा आहे. शिवसेनेत दोन गट पडल्यानंतर स्वत:ची ताकद असणाऱ्या अनेकांनी शिंदे सेनेत प्रवेश केला. फक्त प्रसिद्धीच्या झोतात राहून शिवसेना चालविण्याचे काम किरण काळे यांनी केले.

## थोडक्यात

### दैठणा परिसरात बिबट्यासदृश प्राण्याचा हल्ला; म्हशीचे वासरू ठार

परभणी। प्रतिनिधी

दैठणा परिसरात बिबट्यासदृश प्राण्याने म्हशीच्या वासरावर हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकाराने सर्वत्र खळबळ उडाली असून, परिसरात भितीचे वातावरण तयार झाले आहे.

सदरील प्राण्याने वासराला दोरासह ओढत काही अंतरावर नेले. दरम्यान, शेतात बांधलेल्या कुत्र्याने मोठ्याने भुंकायला सुरुवात केल्यामुळे शेतमालक विष्णू रोहिदास देशमाने यांना जाग आली. त्यांनी तातडीने बॅटरीच्या उजेडात पाहणी केली असता, एक अज्ञात प्राणी त्यांच्या म्हशीच्या वासराला ओढत नेत असल्याचे दिसले. अंधारामुळे तो प्राणी नेमका कोणता, हे ओळखता आले नाही. शेतमालकांनी आवाज केल्यामुळे तो प्राणी वासराला सोडून पळून गेला. मात्र तोपर्यंत म्हशीचे वासरू गतप्राण झाले होते. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले असून वनविभागाने तत्काळ दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. विष्णू देशमाने यांनी ही माहिती लगतच्या शेतकऱ्यांना गुरुवारी ४ वाजता कळवली. यानंतर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी परिसरात पाहणी केली असता बिबट्या सदस्य प्राण्याचे ठसे आढळून आले.

### वैजापुरात विद्युत खांबावर काम करताना विजेच्या धक्क्याने कर्मचाऱ्याचा मृत्यू

वैजापूर। प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या निकालांची धामधूम सुरू असतानाच एक धक्कादायक दुर्घटना समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर शहरात विद्युत खांबावर दुरुस्तीचे काम करत असलेल्या कर्मचाऱ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही घटना वैजापूर शहरातील बीएसएनएल कार्यालयाच्या परिसरात घडली.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित कर्मचारी विद्युत खांबावर चढून तांत्रिक काम करत असताना अचानक त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. यात तो गंभीर जखमी झाला आणि घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. वैजापूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेह, रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली आहे.

जाहीर प्रगटन

**मा दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९६६/२०२५**

**सत्यभामा अरुण जोगदंड विरुद्ध निरंक**

अर्जदार - १. अरुण पि. किसन जोगदंड (मयत) वारस १अ) सत्यभामा भ्र अरुण जोगदंड वय ५३ वर्षे धंदा घरकाम रा. पालि ता. जि. बीड १ब)आकाश पि. अरुण जोगदंड वय ३१ वर्षे धंदा शेती रा. पालि ता. जि. बीड १क) मनोज पि. अरुण जोगदंड वय २६ वर्षे धंदा शेती रा. पाली ता. जि. बीड

विरुद्ध निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत किसन राघु जोगदंड यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत किसन राघु जोगदंड हे दिनांक १५/०४/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे पाली ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १अ ही मयत किसन राघु जोगदंड यांचा मयत मुलगा अरुण पि. किसन जोगदंड यांची पत्नी म्हणजी मयताची सुन असून क्र. १ब) व १क) हे मयत किसन राघु जोगदंड यांची मुलगा अरुण पि. किसन जोगदंड यांचे म्हणजे मयताचे नातू आहेत. त्यांचे शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे किसन राघु जोगदंड या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत किसन राघु जोगदंड रा. पाली ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख २०/०२/२०२६

आज दिनांक १६/०१/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

# उबाठाचे रशीद मामू खान विजयी, प्रवेश दिल्याने ठाकरे सेनेवर झाली होती टीका

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

उबाठाने काँग्रेसचे माजी महापौर रशिद खान मामू यांना प्रवेश दिल्यानंतर राज्यभरात टीकेची झोड उठावण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगरचे नाव बदलण्यासाठीच मामूंना प्रवेश दिल्याचेही आरोप मंत्री नितेश राणे यांनी केले होते. परंतु, प्रभाग ४ मधून रशिद मामू यांच्यासह गणेश लोखंडे असे एकाच प्रभागातून उबाठाचे दोन नगरसेवक विजयी झाले आहेत. महापालिकेच्या निवडणूकीसाठी उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असतांनाच काँग्रेसचे माजी महापौर रशिद मामू खान यांनी उबाठामध्ये प्रवेश केला होता. मुंबईत उद्धव ठाकरे यांच्या उपस्थित हा प्रवेश झाला होता. त्यावरुन भाजपने राज्यभरात ठाकरेंवर टीकेची झोड उठवली होती.



सोशल मीडियावरही त्यावरून ट्रोल करण्यात आले होते. परंतु, मनपा निवडणुकीत ठाकरे सेनेचे रशिद मामू खान यांना मतदारांनी कौल देत विजयी केले. मामू आणि त्यांच्यासोबत प्रभाग ४ मधून लोखंडे हे देखील विजयी झाले आहेत. या विजयानंतर उद्धव ठाकरे गटात विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.

## टीसी हरवला आहे

रामेश्वर बापुराव महानोर रा.शेकटा ता.गेवराई जि.बीड माझा सिंगारवाडी फाटा ते गेवराई बस प्रवासात इयत्ता १२ वी चा टीसी हरवलेला आहे.
मो. ९०११९२५७३१

## टीसी हरवला आहे

संजय रामकिसन मिसाळ रा.शेकटा ता.गेवराई जि.बीड माझा सिंगारवाडी फाटा ते गेवराई बस प्रवासात इयत्ता १२ वी चा टीसी हरवलेला आहे
मो.९९२१८६५३८२

# गौरी लंकेश हत्या प्रकरणातील संशयित आरोपी श्रीकांत पांगारकर विजयी

जालना। प्रतिनिधी

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या निकालात जालन्यातून एक मोठी आणि तितकीच चर्चेत असणारी बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्या गौरी लंकेश हत्या प्रकरणातील संशयित आरोपी श्रीकांत पांगरकर याने जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजय मिळवला आहे. प्रभाग क्रमांक १३ मधून अपक्ष म्हणून लढताना पांगरकरने भाजपच्या उमेदवाराला पराभवाची धूळ चारली आहे.

श्रीकांत पांगरकर हा राजकारणात नवीन नाही. २००१ ते २००६ या काळात तो अविभाजित शिवसेनेचा नगरसेवक होता. मात्र, २०११ मध्ये शिवसेनेने उमेदवारी नाकारल्यानंतर त्याने हिंदु जनजागृती समितीशी जवळीक साधली होती. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी त्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता, परंतु तीव्र जनक्षोभामुळे त्याचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले होते. अखेर कोणत्याही पक्षाची साथ न घेता पांगरकरने अपक्ष म्हणून नशीब आजमावले आणि




त्यात तो यशस्वी ठरला. बेंगळुरू येथे गौरी लंकेश यांची ५ सप्टेंबर २०१७ रोजी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात कर्नाटक पोलिसांनी पांगरकरला संशयित आरोपी म्हणून अटक केली होती. २०१८ मध्ये महाराष्ट्र एटीएसने राज्यभरात जप्त केलेल्या बॉम्ब आणि शस्त्रसाठा प्रकरणातही पांगरकरचे नाव समोर आले होते. त्यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये कर्नाटक उच्च न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता. अद्याप त्याच्यावरील दोष सिद्ध झालेले नाहीत. प्रभाग १३ मध्ये श्रीकांत पांगरकर विरुद्ध भाजप अशी थेट लढत होती. विशेष म्हणजे, या मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपला उमेदवार रिंगणात उतरवला नव्हता, ज्याचा फायदा पांगरकरला झाल्याचे बोलले जात आहे. या विजयामुळे जालना मनपाच्या राजकारणात आता नवीन चर्चांना उधाण आले आहे.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र

शनिवार दि.१७ जानेवारी २०२६


# पत्रकारिता, अर्थकारण आणि राजकारण यांनी जबाबदार काम केलं तरच सजग समाजाची जडणघडण होते -संपादक यमाजी मालकर

## अ.भा. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परळीत शानदार दर्पण दिन व मूकनायक दिन सोहळा : आदर्श पत्रकारिता पुरस्कारांचेही वितरण

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

पत्रकारिता, अर्थकारण आणि राजकारण यांनी हातात हात घालून समाज उभा करण्याची उदात्त भावना ठेवत जबाबदार काम केले तर निश्चितच सजग समाजाची जडणघडण होते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध ज्येष्ठ विचारवंत संपादक यमाजी मालकर यांनी केले. तर सकारात्मक पत्रकारिता ही सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे पत्रकारांची भूमिका ही दिशादर्शकाची असते. समाजाच्या वेदना, व्यथा मांडून एक सकारात्मक दिशा देत मार्गदर्शकाची भूमिका पत्रकार करत असतात अशी भावना नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी व्यक्त केली. परळी येथे अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आयोजित दर्पण दिन व मूकनायक सोहळ्यात मान्यवर बोलत होते.

### सकारात्मक पत्रकारिता सर्वश्रेष्ठ ;व्यथा मांडून, दिशा देत मार्गदर्शकाची भूमिका पत्रकार करतात - नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परळी वैजनाथ येथे दर्पण दिन व मूकनायक दिन समारंभाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात झालेल्या शानदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी परळीतील ज्येष्ठ पत्रकार शंकरआप्पा मोगरकर हे होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत संपादक यमाजी मालकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगरसेवक प्रा. पवन मुंडे, रिपाई नेते सचिन कागदे, ज्येष्ठ पत्रकार अनंत भातांगळे, कै. लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय देशमुख ,माऊंट लिटेरा स्कूलचे उपाध्यक्ष कैलास घुगे, अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय संघटक सुभाष चौरे, विभागीय सचिव रवी उबाळे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे, कार्याध्यक्ष गजानन मुळडेगावकर ,डॉ. शालिनी कराड व डॉ.बालासाहेब कराड यांच्यासह परळीतील संपादक बालासाहेब कडबाने ,ज्ञानोबा सुरवसे,



रामप्रसाद गरड राजेश साबणे मोहन व्हावळे, बालासाहेब फड आदी मान्यवर उपस्थित होते.


या शानदार सोहळ्यात आदर्श पत्रकारिता पुरस्कार २०२६ चे वितरण करण्यात आले. मान्यवरांच्या शुभहस्ते सर्वश्री रामप्रसाद शर्मा यांना जीवन गौरव तर प्रा. रविंद्र जोशी, स्वानंद पाटील ,मिलिंद चोपडे यांना दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर दत्तात्रय काळे ,संभाजी मुंडे, सुकेशनी नाईकवाडे यांना मूकनायक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कराड हॉस्पिटल च्या वतीने देण्यात येणारा रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्कार प्रा. प्रवीण फुटके यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार दत्तात्रय काळे यांनी केले. पुरस्कार प्राप्त पत्रकारांच्या वतीने प्राथमिक स्वरूपात सत्काराला उत्तर प्रा.रविंद्र जोशी यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. राजकुमार एल्लावाड यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रवीण फुटके यांनी केले. यावेळी सविस्तर मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते यमाजी मालकर यांनी पत्रकारितेची बदलती परिस्थिती आणि देशातील बदलत्या व्यवस्थांबाबत अतिशय महत्त्वपूर्ण भाष्य केले. पत्रकारिता हा खऱ्या अर्थाने समाज घडवणारा मुख्य घटक असून या घटकाने आपल्या नैतिकतेपासून बाजूला गेल्यानंतर सामाजिक चांगली वाईट स्थित्यंतरे होतात. त्यामुळे जबाबदार पत्रकारितेची आजच्या युगात जास्त व नितांत आवश्यकता असल्याचे ◀◀ पान ३ वर

# बीड-पालवन-देवराई रस्त्याचे काम तत्काळ सुरू करा -अजय सरवदे

## गुत्तेदारांना फायदा देण्यासाठी कामाचे तुकडे नागरिकांचा जीव धोक्यात

बीड । प्रतिनिधी

बीड-पालवन-देवराई-पिंपळवाडी हा सलग व एकसंध रस्ता असताना, संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी गुत्तेदारांना अनुचित लाभ मिळावा या हेतूने रस्त्याचे काम जाणीवपूर्वक दोन भागांत विभागून दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या निर्णयामुळे रस्त्याचे काम रखडले असून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.



देवराई ते पिंपळवाडी या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले असले, तरी देवराई-पालवन-बीड या मुख्य मार्गाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. या मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून अपघातांची शक्यता वाढली आहे. दररोज शेकडो वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या रस्त्याच्या कामास कार्यालयीन कार्यादेश (थीड़ जीवशी) मिळालेला असतानाही, राजकीय हस्तक्षेप आणि अंतर्गत डावपेचांमुळे प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आलेले नाही. हा प्रकार थेट सार्वजनिक हिताला बाधा आणणारा आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झालेल्या असताना, काही गुत्तेदार मी रस्ता करून देतो अशा पद्धतीने मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र दिसत आहे. निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर करून विकासकामे राजकीय हत्यार म्हणून वापरणे हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करून बीड-पालवन-देवराई रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण पद्धतीने त्वरित सुरू करावे, अशी जोरदार मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्याकडून करण्यात आली आहे. अन्यथा, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासन या गंभीर विषयाकडे डोळेझाक करणार की नागरिकांच्या जीविताचा प्रश्न गांभीर्याने ◀◀ पान ३ वर

# माजलगावात श्री विश्वकर्मा जयंतीनिमित्त भव्य दिंडी व मिरवणूक उत्सवाचे आयोजन -परमेश्वर आमसुले

माजलगाव । प्रतिनिधी

शहरालगत असलेल्या भाटवडगाव येथील श्री संत ज्ञानेश्वर नगर, नवीन वसाहत येथे प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदेखील श्री विश्वकर्मा जयंती व भव्य मिरवणूक उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. श्री विश्वकर्मा प्रभूच्या कृपेने, साधुसंतांच्या आशीर्वादाने व गुरुवर्यांच्या प्रेरणेने तसेच सर्व भाविक भक्तांच्या सहकार्याने हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



हा उत्सव शनिवार, दि.३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते ११.३० या वेळेत संपन्न होणार असून, यामध्ये दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दिंडी सोहळ्यास श्री गुरू बंकटस्वामी महाराज वारकरी शिक्षण संस्था, नेकनूर (ह.भ.प. श्रीकृष्णा महाराज यादव) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.दिंडीचे नेतृत्व बाबुराव स्नपारखे, बालुमामा पांचाळ व पांडुरंग जामकर करणार आहेत.

सकाळी ११.३० ते १२.३० या वेळेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक व मान्यवरांचा सत्कार समारंभ होणार असून, त्यानंतर दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत काल्याचे किर्तन संपन्न होईल.स्थळ : श्री विश्वकर्मा - विठ्ठल रुक्मिणी मंदिर श्री संत ज्ञानेश्वर नगर, नवीन वसाहत, भाटवडगाव ता.माजलगाव, जि. बीड येथे काल्याच्या किर्तनानंतर दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाचे यजमान श्रीमती शाल्लवीताई वल्लभराव चौधरी असणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती आ.प्रकाश सोळंके (आमदार, ◀◀ पान ३ वर

# बीड ते नाळवंडी रस्त्याच्या निकृष्ट कामावरून भाजप युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर आक्रमक

बीड । प्रतिनिधी

शहराजवळील नाळवंडी नाका ते नाळवंडी रस्त्याचा प्रश्न गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक आंदोलने केली. त्यानंतर आता जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर झाला. मात्र सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी होत्या. या परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी क्रेशरची जड वाहतूक सुरू असल्यामुळे सध्या होत असलेले काम फार काळ टिकणार नाही, अशी तक्रार ग्रामस्थांनी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे केली. त्यानंतर त्यांनी शुक्रवारी (दि.१६) रस्त्याची पाहणी केली. काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे.



काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा

यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी इंजि.चोपडे व पोकळे यांना कामाच्या दर्जाबाबत सूचना केल्या. शासनाच्या निकषांनुसार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने काम न झाल्यास सदर काम तात्काळ बंद पाडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी उध्दवराव मेहेत्रे, भाऊसाहेब सुरवसे, ◀◀ पान ३ वर

# गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे भीषण अपघात; दोन गंभीर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जरूड ते वडवणी या रस्त्याचे काम सध्या सुरू असून गुत्तेदाराच्या गंभीर निष्काळजीपणामुळे मौजवाडी फाटा येथे भीषण अपघात घडला. रस्त्याच्या मध्यभागी मातीचे ढिगारे टाकण्यात आल्याने धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या रास्त्यावर संबंधित गुत्तेदाराने उपाययोजना न केल्याने अनेक अपघात झाले असून संबंधित गुत्तेदार एखादी जीवितहानी होण्याची वाट पाहत आहे का? असा असेल तर सवाल नागरिक करत आहेत. या रस्त्यावर योग्य सूचना



फलक, बॅरिकेड्स व रात्रीची प्रकाश व्यवस्था नसल्यामुळे सायंकाळी साडेनऊच्या सुमारास झालेल्या अपघातात सुफियान शेख (वय १९) व शोहेब सय्यद (वय २०, रा. घाटसावळी, ता. व जि. बीड) हे दोघे युवक गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सुफियान शेख यांच्यावर बीड येथील काकू नाना मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. सदर रस्त्याच्या कामात केवळ खड्डे खोदून ठेवण्यात आले असून कोणतीही सुरक्षिततेची उपाययोजना करण्यात आलेली नाही. याच मार्गावर यापूर्वीही अनेक अपघात घडल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून संबंधित गुत्तेदारावर तात्काळ कारवाई करावी व रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करून आवश्यक सूचना फलक लावावेत, अशी जोरदार मागणी माजी सरपंच नागेश शिंदे यांनी केली आहे. अन्यथा ढेकनमोहा येथे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

अपघाताचे प्रमाण वाढले व धुळीमुळे नागरिक त्रस्त_ नागेश शिंदे

या रस्त्याचे काम सुरू असून, या कामातील निष्काळजीपणामुळे रस्त्यावर धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे परिसरातील नागरिक, शालेय विद्यार्थी, वृद्ध व वाहनचालक मोठ्या त्रासाला सामोरे जात आहेत. रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत ठेवून केवळ खोदकाम करण्यात आले असून, धूळ नियंत्रणासाठी ◀◀ पान ३ वर

# प्रा.बाबासाहेब माने यांना ६६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ मराठी पदवी प्रदान

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील आंबेवडगाव येथील प्रा बाबासाहेब माने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ६६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ पार पडला प्राध्यापक डॉ. सुनील भागवत भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आय. आय. एस. इ. आर )प्रा. डॉ. विजय फुलारी( कुलगुरू) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्रा. डॉ. वाल्मीक सरवदे प्र कुलगुरू. प्रा बाबासाहेब डोळे प्रा. प्रशांत अमृतकर (कुलसचिव ) यांच्या हस्ते पी एच डी पदवी प्रदान करण्यात आली.



प्रा. बाबासाहेब माने यांनीनव्दनंतरच्या बदलत्या राजकारणाच्या संदर्भात विजय जावळे यांच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास'' या विषयावर प्रबंध डॉ प्राचार्य शिवदास झेड शिरसाठ यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाला सादर केला दरम्यान प्रा. बाबासाहेब माने यांनी उत्तीर्ण केलेले आहे एम. ए, बी.एड,एम फिल. उत्तीर्ण केलेले आहे या यशाबद्दल प्रा. माने यांचे विभाग प्रमुख प्राचार्य शिवदास शिरसाठ, उपप्रचार्य प्रा..शिंदे , प्रा. दिलीप भिसे, प्रा. राजपंखे, प्रा. घोडके ,प्रा. भरती , प्रा. लोखंडे प्रा. सुरेवाड, प्रा. हंडीबाग सर्व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या सर्व कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी केली रस्ता सुरक्षा जनजागृती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले या अभियानाचे उद्घाटकन प्राचार्य डॉ विश्वासराव कदम यांनी केली तर प्रमुख प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे माजी प्राचार्य डॉ सुनील जाधव प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्राध्यापक विनोद किर्दक सर यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे आयोजन करण्यात आले पाटोदा शहरातील सार्वजनिक रस्त्यावर व छत्रपती शिवाजी महाराज चौक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाटोदा बस स्थानक पाटोदा वाहतुकी संबंधी कायद्याची व नियमाची जनजागृती करण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे डॉ नारायण फुने प्राध्यापक डॉ रामकृष्ण प्रधान प्राध्यापक बी बी लोखंडे यांनी परिश्रम घेतली या अभियानाच्या माध्यमातून व्याख्यान निबंध स्पर्धा वकृत्व स्पर्धा व रस्ता सुरक्षा विषयक कायद्याची जनजागृती करण्यात येत आहे.

# कराड हॉस्पीटलच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्कार प्रा. प्रविण फुटके यांना प्रदान

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ संलग्न परळी पत्रकार परिषद द्वारा आयोजित दर्पण दिन व मुकनायक दिन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात दै. सकाळचे तालुका प्रतिनिधी प्रा प्रविण फुटके यांना कराड हॉस्पीटलच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ संलग्न परळी पत्रकार परिषद द्वारा आयोजित दर्पण दिन व मुकनायक दिन सोहळ्याचे आयोजन येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१६) करण्यात आले होते. शहरातील कराड हॉस्पीटलच्या वतीने दरवर्षी एका पत्रकाराला रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदा हा पुरस्कार कराड हॉस्पीटलच्या वतीने संचालक डॉ बालासाहेब कराड व डॉ शालिनीताई कराड यांनी दै. सकाळचे तालुका प्रतिनिधी प्रा प्रविण फुटके यांना जाहीर केला. हा पुरस्कार अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ संलग्न परळी पत्रकार परिषद द्वारा आयोजित दर्पण दिन व मुकनायक दिन सोहळ्यात महाराष्ट्रातील जेष्ठ सुप्रसिद्ध विचारवंत यमाजी मालकर, शहराच्या नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, जेष्ठ पत्रकार शंकर आप्पा मोगरकर, नगरसेवक पवनकुमार मुंडे, रिपाईचे युवानेते सचिन कागदे यांच्या हस्ते शॉल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पत्रकार, नागरिक उपस्थित होते.

# महानगरपालिकेत भाजप-महायुतीचा, दणदणीत विजय; आष्टीत गुलालाची उधळण व आतिषबाजीतून आनंदोत्सव

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात भारतीय जनता पार्टीला नगरपालिकेत मिळालेल्या प्रचंड यशाच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे आनंदोत्सव साजरा केला. लोकनेते मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या कार्यकर्त्यांनी शहरातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयासमोर गुलालाची उधळण करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी भव्य आतिषबाजी करून विजयाचा जल्लोष करण्यात आला.



भाजपाला मिळालेल्या या घवघवीत यशामुळे आष्टी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यकर्ते, पदाधिकारी एकमेकांना मिठाई भरवत व शुभेच्छा देत आनंद व्यक्त करताना दिसून आले. भाजपाचा विजय असो, सुरेश आण्णा धस आगे बढो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या आनंदोत्सवाच्या प्रसंगी नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे युवा नेते गणेश नाना शिंदे,, नगरसेवक किशोर मामा दरेकर भारत मुरकुटे, कासारी मुर्शिदपूरचे सरपंच अशोक मुळे अँड अविनाश निंबाळकर.माजी सरपंच मनोज धनवडे ग्रामपंचायत सदस्य संतोष रणसिंग कपिल अग्रवाल तसेच राजू शिंदे ऋषी खिळे , नगरसेवक सुरेश वारुंगळे, शरीफ शेख यांच्यासह भाजपचे अनेक ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.जनतेने विकासावर विश्वास ठेवून भाजपाला कौल दिला असून, या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला जाणार नाही. आगामी काळात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने काम करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. भाजपाच्या या विजयामुळे आष्टी शहरात नव्या आशा-आकांक्षांना बळ मिळाले असून, आगामी काळात विकासाची नवी दिशा मिळेल, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# युसूफवडगांव येथे तीन दिवसात दोन ठिकाणी चोरी; सहा लाखांचे सोने गायब

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे गेल्या तीन दिवसांत चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरी करून आजच्या बाजार भावा प्रमाणे जवळपास सहा लाख रूपयांचे सोने तर नगद ७० हजार व चार मोबाईल फोन लंपास केल्याची घटना घडली असुन हे दोन्ही ठिकाणे पोलीस स्टेशन पासुन १ किमीच्या अंतरावर आहेत.

कधी नव्हे ते युसूफवडगांव येथे पोलीस स्टेशन असुन सुध्दा गेल्या तीन दिवसामध्ये चोरट्यांनी जणुन पोलिसांनाच आव्हान देत दोन ठिकाणी धाडसी चोरी केली आहे.यामध्ये पहिली चोरी ही मकरसंक्रांतीच्या आदल्या रात्री जयपाल सुर्यवंशी यांच्या अंबाजोगाई रोड लगत असलेल्या शेतातील वास्तव्यास असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये रात्री आई व नातेवाईक झोपले असता चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश करून पत्र्याच्या पेटीचा कोंडा उचकटुन त्यामधील तीन तोळे तीन ग्राम सोन व नगदी ७० हजार रूपयांचा असा दोन्ही मिळुन ५ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला पैकी मात्र गुन्ह्यात फक्त २ तोळे सोन्याची उल्लेख करण्यात आला कारण बाकीच्या सोन्याची पावती नसल्याने त्याचा उल्लेख टाळण्यात आला तर दुसरी चोरीची घटना ही कळंब रोड लगत नदी जवळ ऊस तोड मजुर शेतात राहुट्या करून राहतात काल दिवसभर ऊस तोड करून व रात्री ऊसाची गाडी भरून देण्यासाठी रात्री खुप उशीर झाला होता त्यामुळे सर्व ऊसतोड मजुर जेवण करून कामाच्या थकव्यामुळे लागलीच झोपी गेले येथे ही चोरट्यांनी सर्वजण गाढ झोपेत असल्याचे पाहुन प्रत्येक राहुटी चेक करत सर्व मजुर महिलांचे थोडे थोडे असे मिळुन तब्बल एक तोळा तीन ग्राम सोने ज्याची बाजार भावाप्रमाणे १ लाख ८० रुपये तर चार मोबाईल ज्यांची किंमत अंदाजे ३०/४० हजार रुपये आहे असे २ लाख २० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला असुन यापैकी एका चोरी गुन्हा दाखल केला असुन दुसऱ्या चोरीचा गुन्हा दाखल झालेला नाही.गावात पोलीस स्टेशन असुन सुद्धा जर चोऱ्या होत असतील पोलिसांच्या कार्यक्षेमतेवर नक्कीच प्रश्न उभारल्या शिवाय राहणार नाही.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.१७ जानेवारी २०२६ । पान ७

# शिरूर नगरपरिषदेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र!

## उपनगराध्यक्षपदी मितेश गादिया, भाजप विरोधी बाकावर



**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात मोठी आणि अनपेक्षित उलथापालथ पाहायला मिळाली. निवडणुकीदरम्यान एकमेकांविरोधात दंड थोपटलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट अखेर उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी एकत्र आले आणि भाजपच्या गणितांना धक्का दिला. उपनगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे मितेश प्रदीप गादिया आणि भाजपचे नितीन पाचर्णे यांच्यात थेट लढत झाली. या निवडणुकीत गादिया यांनी १४ मते मिळवत पाचर्णे (११ मते) यांचा पराभव केला आणि उपनगराध्यक्षपदी बाजी मारली.

शिरूर नगरपरिषदेच्या रसिकलाल धारीवाल सभागृहात उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीसाठी विशेष सभा पार पडली. नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पहिल्याच बैठकीत नगरपरिषदेतील सत्तासमीकरणे स्पष्ट झाली.

राज्य व केंद्रात सत्तेत असलेले भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) स्थानिक पातळीवर एकत्र येतील आणि भाजपचा उपनगराध्यक्ष होईल, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र आल्याने राजकीय गणिते पूर्णतः बदलली. नगरपरिषदेच्या निवडणुकीत सर्वाधिक ११ नगरसेवक निवडून आणणाऱ्या भाजपला अखेर विरोधी बाकावर बसावे लागले.राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे ७ नगरसेवक असून एका अपक्ष नगरसेविकेच्या पाठिंब्यामुळे त्यांचे संख्याबळ ८ झाले आहे. दुसरीकडे, शरद पवार गटासह दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याने नगरपरिषदेत सत्तास्थापना झाली आहे. यामुळे केंद्र व राज्यात एकत्र असलेले भाजप-राष्ट्रवादी पक्ष शिरूरमध्ये मात्र परस्परांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. उपनगराध्यक्षपदी निवड झालेले मितेश प्रदीप गादिया हे प्रभाग क्रमांक ८ मधून निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, निवडणुकीपूर्वी ते भाजपमध्ये होते. मात्र, निवडणूक काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये प्रवेश केला आणि थेट विजय मिळवला. त्यांच्या या निर्णयामुळे शिरूरच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

स्वीकृत नगरसेवकांची निवड -

याच सभेत अभिजित पाचर्णे, राजेंद्र लोळगे, अमोल चव्हाण यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवड करण्यात आली. शिरूर नगरपरिषदेत घडलेल्या या राजकीय जुळवाजुळवीमुळे येत्या काळात स्थानिक राजकारणात आणखी कोणते बदल घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सावरगाव हिंगेमळा येथे बछडा पकडला


**ओझर । प्रतिनिधी**

सावरगाव हिंगेमळा (ता. जुन्नर) येथे ऊसतोडणी सुरू असताना त्यांना एक बिबट्या आणि दोन बछडे आढळले. हिंगे मळ्यातील प्रगतशील शेतकरी शरद हिंगे यांच्या शेतामध्ये हा प्रकार घडल्याने ऊसतोडणी कामगारांमध्ये घबराट निर्माण झाली. नागरिकांना पाहून बिबट मादी व एक बछडा पळून गेले. नागरिकांनी दोन बछडे पकडले परंतु, त्यातूनही एक बछडा पळून गेला असल्याचे सावरगावातील ग्रामस्थ तुकाराम ढमढेरे यांनी सांगितले. याबाबत माहिती समजताच सावरगावचे पोलिस पाटील रूपेश जाधव, सरपंच दीपक बाळसराफ, वन अधिकारी महेश बगाड घटनास्थळी पोहोचले व जेरबंद असलेल्या बछड्याची पाहणी केली. त्यावेळी नागरिकही मोठ्या संख्येने जमा झाले होते. यावेळी संतप्त नागरिकांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरून या परिसरात लवकरात लवकर पिंजरा लावा आणि सर्व बिबटे या ठिकाणावरून घेऊन जा, अशी मागणी केली. वनविभागाचे महेश बगाड यांनी अधिकाऱ्यांशी संपर्क करून पिंजरा बोलावून घेतला आणि हिंगेमळा येथे पिंजरा लावला आहे. जेरबंद झालेल्या बिबट्याच्या बछड्याला वनाधिकारी माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात घेऊन गेले.

## प्रतिस्पर्धी उमेदवाराला पाठिंबा दिल्याने बाणेरमध्ये महिलेसह चौघांना मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

प्रतिस्पर्धी उमेदवाराला समर्थन दिल्याने महिलेसह तिच्या कुटुंबीयांना धमकाविण्यात आले. टोळक्याने महिलेसह चौघांना बेदम मारहाण केल्याची घटना बाणेर परिसरात घडली. या प्रकरणी बाणेर पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.



याबाबत कल्याणी रामदास धनकुडे (वय ३८, रा. धनशीला बंगला, बाणेर ) यांनी बाणेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीनुसार, प्रणित प्रमोद निम्हण, प्रणय प्रमोद निम्हण, प्रसन्न रामभाऊ निम्हण, संदीप नामदेव निम्हण, परवेज शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना गुरुवारी (दि.१५) दुपारी साडेतीन वाजता सत्व हॉटेलच्या गेटजवळ घडली आहे. कल्याणी धनकुडे यांची नणंद सरला बाबुराव चांदेरे यांचे पती बाणेरमधून निवडणूक लढवित आहेत. धनकुडे कुटुंबीयांनी चांदेरे यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे निम्हण कुटुंबीय चिडले होते. गुरुवारी (१५ जानेवारी) दुपारी साडेतीनच्या सुमारास कल्याणी बंगल्याच्या परिसरात थांबल्या होत्या. मतदान प्रक्रिया सुरू असताना आरोपी निम्हण हे धनकुडे यांच्या बंगल्या बाहेर आले. त्यांनी सुरुवातीला धनकुडे यांचा मोटारीवरील चालक सचिन उत्तम फासगे याला लाठी आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाणीत फासगे जखमी झाला. त्यानंतर आरोपींनी कल्याणी यांना शिवीगाळ करुन काठीने मारहाण केली. कल्याणी यांना वाचविण्यासाठी आलेले नवनाथ देशमुख यांना देखील मारहाण केली. कल्याणी यांची नातेवाईक सायली निलेश शिंदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपींनी तिला धक्काबुक्की केली. याप्रकरणी सहायक पोलिस आयुक्त विठ्ठल दबडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलिस निरीक्षक गुन्हे अलका सरग करत आहेत. आरोपी प्रणित निम्हण याने 'निवडणूक झाल्यानंतर तुम्हाला बघून घेतो', अशी धमकी दिल्याचे कल्याणी धनकुडे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. कल्याणी यांच्या फिर्यादीनंतर गुरुवारी रात्री उशिरा गर्दी, मारामारी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## पुण्यात जेलमधून निवडणूक लढवणाऱ्या सोनाली आंदेकर विजयी



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांमध्ये आज मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या प्रभाग क्रमांक २३ (रविवार पेठ-नाना पेठ) मध्ये मोठा फेरबदल झाला आहे. कसबा विधानसभेचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार सोनाली आंदेकर यांनी त्यांचा पराभव केला आहे.

विशेष म्हणजे, सोनाली आंदेकर यांनी ही निवडणूक तुरुंगातून लढवली होती. आयुष कोमकर हत्येचा कट रचल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल असून त्या सध्या जेलमध्ये आहेत. न्यायालयाने त्यांना केवळ उमेदवारी अर्ज भरण्याची परवानगी दिली होती. गुंड बंडू आंदेकर यांच्या सून असलेल्या सोनाली यांनी अटीतटीच्या लढतीत प्रतिभा धंगेकर यांचा पराभव केला. रवींद्र धंगेकर यांनी जेव्हा कसब्याची विधानसभा पोटनिवडणूक जिंकली होती, तेव्हा आंदेकर कुटुंब त्यांच्या पाठीशी होते. मात्र, यावेळेस राजकीय समीकरणे बदलली. आंदेकर कुटुंबातील दोन सदस्य (सोनाली आणि लक्ष्मी आंदेकर) राष्ट्रवादी काँग्रेसकडून रिंगणात उतरल्याने धंगेकरांच्या बालेकिल्ल्यातच त्यांना खिंडार पडले. चौथ्या फेरीपासूनच आंदेकरांनी घेतलेली आघाडी अखेरपर्यंत टिकवून ठेवत विजय संपादन केला. दरम्यान, लक्ष्मी आंदेकर या देखील विजयी झाल्या आहेत. या निकालामुळे पुण्यातील राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

## जनतेचा कौल हा सर्वोच्च-अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**


जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो. विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचं मी मनापासून अभिनंदन करतो, पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो, अशा शब्दांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर महानगरपालिका निवडणुकीतील निकालावर प्रतिक्रिया दिली आहे.



आम्ही अधिक जबाबदारीने काम करत राहू स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जिथं अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीनं, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू, असं खात्रीनं स्पष्ट करतो, असेही त्यांनी नमूद केले आहे.

जनतेसाठी अखंड कार्यरत राहणं हेच ध्येय ठेवावे यश मिळवलेल्या सर्व उमेदवारांनी आपापल्या महानगरपालिकांमध्ये जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत, विकास आणि लोककल्याणाच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्याचबरोबर जे विजयी होऊ शकले नाहीत, त्यांनीही निराश न होता जनतेसाठी कार्यतत्पर राहावं, केंद्रस्थानी नेहमी जनतेचं भलं आणि जनतेसाठी अखंड कार्यरत राहणं हेच ध्येय ठेवावं, असं आवाहन करतो, असेही त्यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

## मुळशीत निवडणुकीची रणधुमाळी सुरु; पहिल्याच दिवशी अर्जांसाठी इच्छुकांची झुबड



**पौड । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यात पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांचे बिगुल वाजले असून, राजकीय हालचालींना वेग आला आहे. उमेदवारी अर्ज वितरण आणि स्वीकारण्याच्या प्रक्रियेला आजपासून सुरुवात झाली असून, पहिल्याच दिवशी इच्छुकांनी पौड येथील सेनापती बापट सभागृहात अर्ज घेण्यासाठी मोठी गर्दी केली. विशेष म्हणजे, पहिल्या दिवशी ५७ उमेदवारांनी तब्बल १४५ अर्ज नेले आहेत, मात्र अद्याप एकही अर्ज अधिकृतपणे दाखल झालेला नाही.

निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल उदमले आणि तहसीलदार विजयकुमार चोबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रशासकीय प्रक्रिया राबवली जात आहे. अनेक उमेदवारांनी तांत्रिक त्रुटी टाळण्यासाठी एकापेक्षा जास्त, म्हणजे प्रत्येकी दोन ते चार अर्ज घेतल्याने अर्जांचा आकडा विक्रमी ठरला आहे. यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, कोणत्या गटातून कोण मैदानात उतरणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. शेवटच्या दिवशी अर्जांची प्रत्यक्ष संख्या आणि रिंगणात असलेल्या उमेदवारांचे स्पष्ट चित्र समोर येईल. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल उदमले, सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार विजयकुमार चोबे , नायब तहसीलदार मदन जोगदंड, सहाय्यक महसूल अधिकारी बंडू कुबडे, सहाय्यक महसूल अधिकारी मंगेश शिंगटे व इतर महसूल अधिकारी, महसूल सेवक व पौड पोलिस स्टेशन चे पोलिस हवालदार चंद्रकांत सोनवणे, हवालदार राजकुमारी हरिश्चंद्रे उपस्थित होते.

## क्षुल्लक कारणावरुन ग्राहकाला मारलं, दुकानदाराला ३ वर्षांची शिक्षा

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

लग्नाला जायचे आहे कपडे लवकर इस्त्री करून द्या या कारणावरून झालेल्या भांडणात ग्राहकाला बेदम मारहाण करणाऱ्या दोघांना ३ वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी २ हजार रुपये दंडाची शिक्षा राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी सुनावली. तेजस वसंतराव फुलावरे, सचिन उर्फ पप्पू वसंतराव फुलावरे अशी आरोपींची नावे आहेत. आरोपीचे वडील वसंतराव फुलावरे यांची आरोपातून मुक्तता करण्यात आली.

या खटल्याची माहिती अशी, २० एप्रिल २०१३ रोजी चाकण शहरातील माणिक चौकात हार्दिक भालचंद्र पिंगळे हा वसंतराव फुलावरे यांच्या दुकानात दुपारी बाराच्या सुमारास कपड्याला इस्त्री करण्यासाठी गेला होता. त्यावेळी हार्दिक पिंगळे, लवकर इस्त्री करून द्या असे म्हणाला. त्याचा वसंतराव फुलावरे यांच्याशी वाद झाला. वादाचे रूपांतर शिवीगाळीत झाले. या वेळी



वसंतराव फुलावरे यांची मुले तेजस वसंतराव फुलावरे,

सचिन उर्फ पप्पू फुलावरे (सर्व रा. चाकण, ता. खेड) यांनी हार्दिक पिंगळे याला शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. यात हार्दिक जखमी झाले. त्यांनी याबाबत चाकण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. चाकण पोलिसांनी दोन्ही मुलांसह वसंतराव फुलावरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक सुशील कदम यांनी केला होता. हा खटला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात न्यायाधीश सय्यद यांच्या कोर्टात सुरू होता. सरकारपक्षाच्या वतीने सरकारी वकील मिलिंद पांडकर यांनी ७ जणांची साक्ष घेतली. जखमी फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. फिर्यादीतर्फे ड. रजनी देशपांडे यांनी काम पाहिले. न्यायाधीश सय्यद यांनी तेजस वसंतराव फुलावरे, सचिन उर्फ पप्पू फुलावरे यांना दोषी ठरवून शिक्षा ठोठावली. वसंतराव फुलावरे यांची या खटल्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. या खटल्यात कोर्ट पैरवी म्हणून पोलिस शिपाई पूजा काळे, उषा होले यांनी काम पाहिले.

## महापालिका जिंकताच भाजपचा मोठा निर्णय; आता अजित पवारांशी युती नाहीच?

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचा निकाल जाहीर होताच भाजपने राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणारा मोठा निर्णय घेतला आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका भाजप स्वबळावर लढवणार असल्याचे स्पष्ट संकेत पक्षाने दिले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.



राज्यातील महापालिकांच्या निकालात भाजपने दणदणीत यश मिळवले असून मुंबई, पुण्यासह अनेक महत्त्वाच्या महापालिकांवर भाजपचा झेंडा फडकण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आता जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला मोठा धक्का दिला आहे. या दोन्ही महापालिकांमध्ये भाजपाचाच महापौर बसणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. यानंतर आता भाजपने जिल्हा परिषद निवडणुकीतही अजित पवार गटापासून स्वतंत्र वाटचाल करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपचा 'स्वबळाचा' नारा

महापालिका निवडणुकांमध्ये भाजपने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेत असूनही सोबत घेतले नव्हते. राष्ट्रवादीने अनेक ठिकाणी स्वतंत्र निवडणूक लढवली, मात्र अपेक्षित यश मिळू शकले नाही. याच पार्श्वभूमीवर आता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. पुणे जिल्हा परिषद निवडणूक स्वबळावर लढवण्याचा ठाम निर्धार भाजपने व्यक्त केला आहे.

## हाताला चावा, शस्त्रांचा धाक; डॉक्टरच्या अपहरणामुळे पुणे जिल्ह्यात खळबळ, १९ लाखांची खंडणी उकळली

**हवेली । प्रतिनिधी**

कुंजीरवाडी (ता. हवेली) येथे डॉक्टरचे अपहरण करून ठार मारण्याची धमकी देत तब्बल १९ लाख रुपयांची खंडणी उकळण्यात आली. याप्रकरणी पाच अनोळखी व्यक्तींवर उरुळी कांचन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १० ते दि. १२ दरम्यान प्रयागधाम फाट्याच्या पुढे इनामदारवस्ती परिसरात घडली.



याप्रकरणी संबंधित डॉक्टरने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे पुणे-सोलापूर महामार्गावरील कुंजीरवाडी गावात रुग्णालय आहे. शनिवारी रात्री सव्वादहा ते साडेदहा वाजता त्यांच्या कारमधून निघाले होते. त्यांच्याबरोबर गाडीचालक व रुग्णालयातील एक मदतनीस होता. कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इनामदारवस्ती परिसरात आले असता पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या पाच अनोळखी इसमांनी त्यांची गाडी अडवली. आरोपींनी तिघांचे अपहरण करून शस्त्राचा धाक दाखवत मारहाण केली. तसेच एका आरोपीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या दंडाला चावा घेतला.

आरोपींनी फिर्यादी, त्यांचे सहकारी व त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देत २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. आरोपींनी १९ लाख रुपये रोख स्वरूपात स्वीकारून तिघांना ताब्यात ठेवले. फिर्यादी डॉक्टरांनी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दिल्यानंतर आरोपींवर गुन्हा नोंदविण्यात आला. दौंडचे उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस, पोलिस निरीक्षक सचिन वांगडे, सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे व स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक सिद्ध पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली.

## आंबेगावातील १० गण अन् ५ गटांसाठी 'फिल्डिंग' सुरू; 'या' बड्या चेहऱ्यांची नावे चर्चेत

**आंबेगाव । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी राजकीय हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर विविध राजकीय पक्षांकडून अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यासाठी बैठका, चर्चा आणि आढावे घेण्याचे सत्र सुरू झाले आहे. इच्छुक उमेदवारांनी संपर्क वाढवला असून पक्षांतर्गत चाचपणीला गती आली आहे.

या निवडणुकीत आंबेगाव तालुक्यात पंचायत समितीच्या एकूण दहा गणांसाठी तर जिल्हा परिषदेच्या पाच गटांसाठी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रत्येक गण आणि गट महत्त्वाचा ठरणार असून पक्षांकडून जिंकण्याच्या दृष्टीने मजबूत उमेदवार देण्यावर भर दिला जात आहे. संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत असून स्थानिक समीकरणे, सामाजिक समतोल आणि मागील निवडणुकांचे निकाल लक्षात घेऊन निर्णय घेतले जात आहेत. पक्षश्रेष्ठींच्या उपस्थितीत तालुकास्तरावर तसेच जिल्हास्तरावर बैठका घेऊन उमेदवारीबाबत मतमतांतरे जाणून घेतली जात आहेत. काही पक्षांकडून प्राथमिक यादी तयार करण्यात आली असून अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, निवडणूक मतदान तारीख जवळ आल्याने इच्छुक उमेदवारांनी मतदारांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. गाठीभेटी, बैठका आणि विकासकामांचा आढावा देत प्रचाराची तयारी केली जात आहे.पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमुळे आगामी काळात आंबेगाव तालुक्यातील राजकीय वातावरण अधिकच तापणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

## सीमेवर लढणाऱ्या सैनिकांसाठी समाजाने हात पुढे करा



**वाल्हे । प्रतिनिधी**

'सीमेवर प्राणपणाने लढणाऱ्या प्रत्येक सैनिकांमुळेच आपण सुरक्षित आहोत. त्यांच्या बलिदानाची जाणीव ठेवून समाजाने त्यांच्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबांसाठी काहीतरी ठोस केले पाहिजे,'' असे भावनिक प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या सुमेधा योगेश चिथडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

वाल्हे (ता. पुरंदर) महर्षी वाल्मीकी विद्यालयात देशभक्तीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी सुमेधा योगेश चिथडे यांचा यशोगाथा व प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी चिथडे बोलत होत्या. ॲड. विद्या नामदेव भुजबळ यांच्या पुढाकारातून कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सतीश निगडे होते. याप्रसंगी सरपंच अतुल गायकवाड, सेवानिवृत्त कृषी अधिकारी सिद्राम भुजबळ, प्रा. नामदेव भुजबळ, बाळासाहेब राऊत, ज्योती एडके, माजी सरपंच विमल भुजबळ, अंकुश माळवदकर, रज्जाकभाई पानसरे, दामोदर पवार, साईनाथ चव्हाण, संजय ढावरे, सुचिता हिंगणे, सारिका बनकर आदी उपस्थित होते.

यावेळी चिथडे यांनी सांगितले की, देशासाठी बलिदान देणाऱ्या जवानांच्या कुटुंबीयांसाठी काहीतरी करण्याच्या भावनेतून १९९९ मध्ये पती योगेश चिथडे यांच्या सहकार्याने 'सोल्जर्स इंडिपेंडंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन'ची स्थापना केली. या संस्थेमार्फत हुतात्मा जवानांच्या कुटुंबांना आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक आधार देणे तसेच वीरनारींना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात.

भारतीय सैनिकांसाठी केलेल्या ठोस उपक्रमांविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, सियाचिन, लेह, लडाख आणि जम्मू-काश्मीरसारख्या अतिदुर्गम भागात देशातील पहिला ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला. कठीण हवामानात लढणाऱ्या जवानांना हे प्रकल्प मोठा आधार देतात. आमचे कार्य हे त्यांच्यासाठी कृतज्ञतेचे प्रतीक आहे.सैनिकांसाठी अखंड सेवाभाव जपणाऱ्या चिथडे यांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी आणि त्यातून प्रेरणा मिळावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे ॲड. विद्या नामदेव भुजबळ यांनी सांगितले.

cmyk